- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४८,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,३२,३५० /-
✔ चांदी : १,९८,७००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, ३ नोव्हेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३२४ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

'महाराष्ट्रात सध्या कोरोनासारख्या 'झाडखाऊ' व्हायरसची लागण'

सयाजी शिंदेंचा सरकारवर हल्लाबोल, कर्जतमधील प्रकल्पाविरोधात नागपुरात राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्रात कोरोनासारख्या 'झाडखाऊ' व्हायरसची लागण झाली आहे, अशी बोचरी टीका चित्रपट अभिनेते व पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या सयाजी शिंदे यांनी केली आहे. सरकारवर गंभीर आरोप करत त्यांनी कर्जतमधील प्रकल्पाविरोधात राज्यव्यापी 'सह्याद्री वाचवा' आंदोलनाची घोषणा केली आहे. ३२ हजार झाडे तोडण्यास विरोध दर्शवत राज्यभरातील नागरिकांना आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन देखील त्यांनी नागरिकांना केलं आहे. ते नागपुरात बोलत होते.

महाराष्ट्रात सध्या कोरोनासारख्या झाडखाऊ व्हायरसची लागण झाली आहे, अशी टीका करत अभिनेते सयाजी शिंदे यांनी सह्याद्रीच्या संरक्षणासाठी राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. कर्जत येथे प्रस्तावित प्रकल्पासाठी तब्बल ३२ हजार झाडे तोडली जाणार असल्याचा दावा करत त्यांनी या प्रकल्पाला विरोध दर्शवला. सरकारने एकही झाड तोडले जाणार नाही, असे जाहीर करेपर्यंत आंदोलन थांबवणार नसल्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, कर्जतमधील प्रकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्राची फसवणूक केली जात असून, सह्याद्रीची झाडेझुडपे नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप सयाजी शिंदे यांनी केला. आता नागरिकांनी घराबाहेर पडून या आंदोलनात सहभागी व्हावे. हे आंदोलन केवळ एका ठिकाणापुरते मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रात सुरू झाले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. वीजनिर्मिती माणसासाठी आवश्यक असली, तरी त्यासाठी ३२ हजार झाडांचा बळी का द्यायचा? असा सवाल शिंदे यांनी उपस्थित केला. विजेसाठी माणसाला विस्थापित करा, झाडांना नाही, अशी भूमिका मांडत त्यांनी पर्यावरणाच्या रक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राचा राज्यप्राणी शेकरूही धोक्यात येऊ शकतो, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्रातील सर्व कलावंत, वकील, डॉक्टर, खेळाडू, शेतकरी संघटना आणि बचत गटांच्या संघटनांनी 'सह्याद्री वाचवा' आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य आणि पराक्रम सांगायचा, त्यांच्या गड-किल्ल्यांचे गुणगान गायचे आणि दुसरीकडे सह्याद्रीवरील झाडे नष्ट करायची, हा दुटप्पीपणा असल्याची टीकाही त्यांनी केली.

दरम्यान, वृक्षारोपणाच्या नावाखाली प्रत्येक जिल्ह्यात किती झाडे लावण्यात आली आणि त्यापैकी प्रत्यक्षात किती झाडे जगली, याची माहिती नागरिकांनी गोळा करावी, असे आवाहन शिंदे यांनी केले. वृक्षारोपणाच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्यांना उघड करण्याची वेळ आली असल्याचे सांगत त्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याचे आवाहन केले. दिवाळी साजरी करण्यापेक्षाही सह्याद्रीच्या रक्षणासाठी आंदोलनात सहभागी होण्याला प्राधान्य द्यावे, असेही ते म्हणाले.

थोडक्यात

कांदा, लिंबू आणि लसणाचे दर तेजीत

छ. संभाजीनगर : बाजार समितीत कांदा, लिंबू आणि लसणाचे दर अद्यापही चढेच असल्याने स्वयंपाकघराचे बजेट कोलमडले आहे. मात्र, भाजीपाल्याची आवक वाढल्याने शहरातील किरकोळ बाजारात अनेक भाज्यांच्या दरात घसरण झाली आहे. यात टोमॅटो, वांगी, कोबी, फ्लॉवर, भोपळा आणि काकडीच्या दरात किलोमागे १० ते २० रुपयांची घट झाली आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून महागाईचा सामना करणाऱ्या ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. जाधववाडी भाजीमंडईतील घाऊक बाजारात कांदा, लिंबू आणि लसणाचे दर अद्यापही तेजीत आहेत. त्यामुळे गृहिणींना स्वयंपाकघराचे बजेट सांभाळताना कसरत करावी लागत आहे. दरम्यान, घाऊक बाजारात भाजीपाल्याची आवक वाढली असून, त्याचा परिणाम किरकोळ बाजारात दिसून येत आहे. औरंगपुरा, गुलमंडी, शहागंज, टीव्ही सेंटर आणि मुकुंदवाडी येथील बाजारांत टोमॅटोचे दर ५० रुपयांवरून ४० रुपये किलोवर आले आहेत. तसेच भोपळ्याचे दर ६० रुपयांवरून ४० रुपये, काकडीचे दर ६० रुपयांवरून ५० रुपये, तर वांग्याचे दर ८० रुपयांवरून ६० रुपये किलो झाले आहेत. कोबी आणि फ्लॉवरच्या दरातही प्रत्येकी २० रुपयांची घट झाली आहे. त्यामुळे कोबी ४० रुपये, तर फ्लॉवर ६० रुपये किलोने विकले जात आहे.

बिझनेस जेट कोसळून विमानातील सर्व ९ जणांचा मृत्यू



वृत्तसंस्था, अमेरिका

अमेरिकेतील दक्षिण फ्लोरिडा प्रांतातील पाम बीच काउंटी भागात एक अत्यंत भीषण विमान दुर्घटना घडली असून एका बिझनेस जेट अपघातात विमानातील सर्व ९ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. रविवारी दुपारी सुमारे १२:५० वाजता हे खाजगी लियरजेट ६०विमान थेट आकाशातून जमिनीच्या दिशेने कोसळले आणि रस्त्याजवळ धडकून त्याचा आगीच्या प्रचंड गोळ्यात स्फोट झाला. विमानाचा अपघात निवासी परिसरातील घरांपासून आणि धावपळीच्या मुख्य रस्त्यावरील वाहनांपासून अगदी काही पावलांच्या अंतरावर घडला.

अमेरिकेचे वाहतूक सचिव शॉन डफी यांनी या दुर्घटनेला अत्यंत भीषण शोकांतिका संबोधत विमानातील सर्व ९ जणांचा मृत्यू झाल्याची अधिकृत पुष्टी केली आहे. विमान प्रवाशांच्या वाहनांमधील कॅमेऱ्यांमध्ये आणि प्रत्यक्षदर्शींनी नोंदवलेल्या व्हिडिओनुसार, विमान अत्यंत वेगाने खाली आले आणि रस्त्याच्या कडेला आदळताच मोठा स्फोट झाला. आदळल्यामुळे रस्त्यावर मोठा खड्डा तयार झाला असून सर्वत्र ज्वाळा, रस्त्याचे तुकडे आणि काळ्या धुराचे लोट पसरले होते. घटनास्थळी पाहणी करताना फ्लोरिडाचे गव्हर्नर रॉन डिसँटिस यांनी सांगितले की, हा एक प्रलयंकारी अपघात होता. एखादी क्षेपणास्त्र थेट खाली कोसळावी तसे हे विमान आले आणि रस्त्याच्या कडेला मोठा खड्डा करून गेले.

सुदैवाने, जमिनीवर असलेला कोणताही नागरिक या अपघातात जखमी किंवा ठार झालेला नाही. हे विमान टेक्सास येथील ऑस्टिन-बर्गस्ट्रॉम आंतरराष्ट्रीय विमानतळावरून बहामासच्या दिशेने उड्डाण करत होते. अपघात घडण्यापूर्वी सुमारे ३५,००० फूट उंचीवर असताना वैमानिकाने हवेतील तीव्र तुफानी वारे (टरब्युलन्स) आणि विमानावर बर्फ जमा होत असल्याची (आईसिंग) माहिती हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाला दिली होती.

मशिनचा तारेला स्पर्श, कंत्राटदारासह ८ मजुरांचा मृत्यू, ५ जखमी



वृत्तसंस्था, राजस्थान

रस्त्याचे काम सुरु असतानाच मशीनचा राजस्थानमधील झुंझुनू जिल्ह्यातील छपोली गावात रस्त्याचे काम सुरु असतानाच आठ कामगारांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. या अपघातात इतर पाच जण जखमी झाले. हा अपघात सकाळी १० वाजण्याच्या सुमारास घडला. उदयपूरवतीचे एसएचओ रामपाल म्हणाले, "रस्त्यावर काम करणाऱ्या एका ग्रॅव्हेल मिक्सर मशीनचा हायड्रॉलिक जॅक डोक्यावरील उच्च-दाब तारेला लागला. यामुळे मशीनमधून विद्युत प्रवाह वाहिला आणि कामगारांना विजेचा धक्का बसला.

११ केव्हीची ही लाईन मूळतः रस्त्यापासून दूर होती, परंतु अलीकडेच ती बदलण्यात आली. अपघातानंतर गावकरी आंदोलन करत आहेत. गावकरी रोहिताश्व म्हणाले, "११ केव्हीची लाईन मूळतः रस्त्यापासून दूर होती, परंतु काही दिवसांपूर्वी ती रस्त्याच्या वरून हलवण्यात आली. सखल तारेमुळे हा मोठा अपघात घडला."गावकरी अविनाश म्हणाले, "हे काम वारंवार थांबवण्यात आले आहे. काम कोणतेही असो, सरकारला या गावात काही देणंघेणं नाही." गावकऱ्यांनी या कामासाठी पैसे गोळा केले होते. तरीही, सरकारी अधिकाऱ्यांनी आणि राजकारण्यांनी दोनदा काम थांबवले. खूप पाठपुरावा केल्यानंतरच काम पुन्हा सुरू करण्यात आले.

प्राथमिक अहवालानुसार, पाच कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर तिघे गंभीररित्या भाजले. तथापि, पोलिसांनी नंतर मृतांची संख्या आठ असल्याचे सांगितले. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासकीय पथके घटनास्थळी दाखल झाली. मोठ्या संख्येने ग्रामस्थही घटनास्थळी जमले होते. स्थानिक लोकांच्या मदतीने मदत आणि बचाव कार्य करण्यात आले. अपघातानंतर, बांधकाम स्थळावरील सुरक्षेच्या व्यवस्थेबद्दलही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

मुख्यमंत्री शर्मा आणि माजी मुख्यमंत्र्यांनी शोक व्यक्त केला मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी अपघातावर शोक व्यक्त केला. एका एक्स-पोस्टमध्ये शर्मा यांनी लिहिले, "झुंझुनू अपघातात विजेचा धक्का लागून कामगारांच्या अकाली मृत्यूची बातमी दुःखद आहे." संबंधित अधिकाऱ्यांना जखमींवर योग्य उपचार आणि पीडित कुटुंबांना तत्काळ सर्वतोपरी मदत करण्याचे, तसेच या घटनेची चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आम्ही परमेश्वराकडे प्रार्थना करतो की, दिवंगत आत्म्यांना त्याच्या चरणी स्थान मिळो, जखमींना लवकरात लवकर बरे वाटो आणि शोकाकुल कुटुंबांना हे अथांग दुःख सहन करण्याची शक्ती मिळो. ओम शांती!

राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी या घटनेवर दुःख व्यक्त केले आहे.

न्यायालये बॉम्बने उडवून देऊ, ई-मेलवरुन धमकी; ठाणे, सांगली, परभणी, बीड, सोलापुरात न्यायालय परिसर केला रिकामा

मुंबई : राज्यभरातील विविध जिल्ह्यातील जिल्हा न्यायालय उडवून देण्याचा ई-मेल आल्याने सर्वत्र खळबळ उडाली असून पोलीस यंत्रणांनी सर्वच न्यायालयांचा परिसर रिकामा केल्याचं दिसून आलं. ठाणे, सांगली, सोलापूर, बीड, परभणी, हिंगोलीसह राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील न्यायालयाला असा धमकीचा ई-मेल आल्याची माहिती असून सर्वच ठिकाणी पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून अधिक तपास सुरू आहे. सायबर पोलिसांकडूनही ई-मेल पाठवणाऱ्या आरोपीचा शोध घेतला जात आहे.

ठाणे जिल्हा न्यायालयात आयईडी बॉम्बस्फोट घडविण्याची धमकी ई-मेल द्वारे आज देण्यात आली. त्यानुसार, २७ नोव्हेंबरपर्यंत ठाणे जिल्हा न्यायालयात बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी देण्यात आली आहे. तसेच मेट्रो स्थानकांवर रात्री ९.११ वाजता बॉम्बस्फोट घडवण्याचा उल्लेखही त्यात करण्यात आला आहे. सन १९८४ मधील रक्तपाताचा बदला रक्ताने घेण्याचा उल्लेख या ई-मेलमध्ये केला आहे. आपण दिलजीत दोसांझ याचा साथीदार असल्याचा उल्लेख करत, २७ नोव्हेंबर रोजी महालक्ष्मी रेसकोर्स येथे होणाऱ्या कार्यक्रमात आयफोनमध्ये आयईडी ठेवून बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी आरोपीने दिली आहे. मराठी बांधवांनो, आपल्या मुलांना वाचवा, २७ नोव्हेंबर रोजी महालक्ष्मी रेसकोर्स येथे दिलजीत दोसांझ यांच्या कार्यक्रमात बॉम्बस्फोट घडवले जातील., अशा आशयाचा मजकूर मेलमध्ये आहे.

दरम्यान, याप्रकरणी ठाणे परिमंडळ १ चे पोलिस उपायुक्त बाळासाहेब पाटील यांनी माहिती दिली. आज सकाळी ९.४३ वाजता कोर्टाच्या रजिस्टार कार्यालयाच्या अधिकृत ईमेल आयडीवर बॉम्ब ठेवल्याचा आणि दुपारी ३.११ वाजता त्याचा स्फोट होणार असल्याचा संदेश पंजाबी भाषेत मेलद्वारे प्राप्त झाला. संदेश मिळताच निश्चित केलेल्या मानक कार्यपद्धतीनुसार दोन्ही कोर्ट इमारती पूर्णपणे मोकळ्या करण्यात आल्या. इमारतींमधील लोकांना वरच्या मजल्यापासून ते खालच्या मजल्यापर्यंत बाहेर काढून परिसरापासून सुमारे १०० मीटर अंतरावर सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आल्याची माहिती पाटील यांनी दिली.

अमेरिकेत हॅलोविन वीकेंडला गोळीबाराचे तांडव, ६ जणांचा मृत्यू, १५ हून अधिक जखमी

वृत्तसंस्था, अमेरिका

अमेरिकेत हॅलोविन वीकेंडच्या काळात उत्साहाचे आणि उत्सवाचे वातावरण अचानक भयानक शोकांतिकेत बदलले आहे. देशातील विविध शहरांमधील नाईटलाईफ भाग आणि प्रसिद्ध ठिकाणांवर गोळीबाराच्या अनेक घटना घडल्या. या हिंसक घटनांमध्ये एकूण सहा जणांचा मृत्यू झाला असून १५ हून अधिक लोक गंभीर जखमी झाले आहेत. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तपास वेगाने सुरू केला असून अनेक संशयितांना ताब्यात घेतले आहे. गोळीबाराच्या या सत्रात डलास शहरात सर्वाधिक हिंसाचार पाहायला मिळाला. डलास पोलिसांच्या माहितीनुसार, शहरातील प्रसिद्ध डीप एलम भागात गोळीबाराच्या तीन वेगवेगळ्या घटना घडल्या.

डीप एलम हा परिसर संगीत, उपहारगृहे आणि नाईटलाईफसाठी अत्यंत लोकप्रिय मानला जातो, जिथे हॅलोविनच्या निमित्ताने मोठी गर्दी जमली होती. शनिवारी रात्री झालेल्या या गोळीबारात चार जणांचा मृत्यू झाला तर सुमारे १५ जण जखमी झाले. डलासचे पोलीस प्रमुख डॅनियल कोमोक्स यांनी सांगितले की, शनिवारी रात्री या तीन स्वतंत्र घटना घडल्या. पोलिसांनी काही संशयितांना अटक केली असून त्यांची कसून चौकशी केली जात आहे. हा गोळीबार एकाच कारणातून झाला का आणि या घटना एकमेकांशी जोडलेल्या आहेत का, याचा शोध पोलीस घेत आहेत.अलबामातील फुटबॉल सामन्यानंतर गोळीबार दुसरीकडे अलबामा प्रांतातील बर्मिंघम शहरातही गोळीबाराची घटना घडली. मॅजिक सिटी क्लासिक फुटबॉल सामना संपल्यानंतर लीजन फील्ड स्टेडियमबाहेरील ग्रेमोंट एव्हेन्यू परिसरात काही दुकानांजवळ ही घटना घडली.

या गोळीबारात एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून आठ जण जखमी झाले आहेत. बर्मिंघमचे पोलीस प्रमुख मायकेल पिकेट यांनी सांगितले की, सामना संपल्यानंतर बहुतांश नागरिक आणि कुटुंबे निघून गेली होती, मात्र बाहेरील गर्दीच्या ठिकाणी हा गोळीबार झाला. पोलीस प्रवक्ते डीरेल फ्रीमैन यांनी दिलेल्या माहितीनुसार याप्रकरणी एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले असून घटनास्थळावरून अनेक शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.



अनेक शहरांत भीतीचे सावट आणि सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

याव्यतिरिक्त अर्कांसस प्रांतातील फेयेटविले आणि डेलावेअरमधील नेवार्क शहरांमध्येही गोळीबाराच्या घटना समोर आल्या आहेत. या सर्व घटनांमुळे अमेरिकेतील सुरक्षेच्या व्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. हॅलोविनसारख्या मोठ्या सणाच्या काळात घडलेल्या या हिंसक घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी या सर्व प्रकरणात कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले असून नागरिकांना कोणत्याही संशयित हालचालींची माहिती त्वरित प्रशासनाला देण्याचे आवाहन केले आहे.



संपादकीय लेखणीतून...

शाहीर अनंत फंदी : रावबाजीवरील लावणी

शाहीर अनंत फंदी हे मराठीतील एक प्रख्यात कवी, शाहीर आणि 'फटका' या काव्यप्रकाराचे जनक मानले जातात. त्यांच्याविषयी मूलभूत माहिती अशी- मूळ नाव: अनंत भवानीबाबा घोलप- अनंत नामदेव फंदी. जन्म: १७४४, संगमनेर, जिल्हा अहमदनगर. कुटुंब: आई राऊबाई, पत्नी म्हाळसाबई; मुलगा सवाई फंदी-जो कवी व कीर्तनकार होता. कार्यकाळ: उत्तर पेशवाई- दुसरा बाजीराव पेशवा यांच्या काळातील दरबारी कवी. मृत्यू: दि. ३ नोव्हेंबर १८१९."फंदी" हे आडनाव कसे पडले: संगमनेरमध्ये "मलकफंदी" नावाचा एक चमत्कारिक वृत्तीचा फकीर राहत असे. अनंत फंदींचा त्याच्याशी स्नेह असल्याने लोक त्यांनाही "फंदी" म्हणू लागले. साहित्य आणि काव्य रचना: (१) फटका चे जनक: समाजातील गंभीर किंवा उपदेशपर गोष्टी कठोर व चपखल भाषेत मांडण्यासाठी त्यांनी "फटका" हा काव्यप्रकार रुजवला. (२) त्यांचा अत्यंत प्रसिद्ध उपदेशपर फटका: "बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडू नको, संसारा मधी ऐस आपुला उगाच भटकत फिरू नको". (३) इतर रचना: त्यांनी लावण्या, पोवाडे, कटाव आणि "श्रीमाधवनिधन" हा ग्रंथ लिहिला. (४) विशेष रचना: "रावबाजीवरील लावणी" आणि "नाना फडणविसांचा पोवाडा" व फटका प्रचंड गाजले. (५) समकालीन गौरव: थोर शाहीर होनाजी बाळा यांनी अनंत फंदींचा गौरव "फंदी अनंत कवनांचा सागर" असा केला होता.

शाहीर अनंत फंदी यांच्याविषयी होनाजी बाळानी एक कविता लिहिली आहे ती काहीसी अशी-

"फंदी अनंद कवनाचा सागर ।

अजिंक्य ज्याचा हातखंडा चमत्कार॥ चहूकडे चालतो, सृष्टींवर ज्याचा झेंडा ॥ धृ० ॥

आपले संगमनेर ठिकाण त्याचे,

कीर्ति उदय जैसा अर्की ॥

नवीन तर्हार नारळी डोईला ।

पदर पागोटयाची फिरकी ॥

वाचावंत संपत्ती, बहुतांचें तनमन हारकी ॥

लागिलुंगे कवि दरले ।

अवघ्यात त्याची गुर्की ॥

छायाचित्र गातां कोणी टिकेना,

मनमर्धी बसली कर्की ॥

धन ज्याचा हातचा मळ ।

जरा तोच हांडा ॥ च० ॥

फंदी आनंदी छंदी वरदी । ब्राह्मण त्याव ॥ ॥"

उत्तर पेशवाईत विशेष गाजलेल्या शाहिरींपैकी सर्वात जेष्ठ शाहीर. हे अहमदनगर नागरिक संगमनेर येथे राहणारे, अजूनही संगमनेर येथे "अनंत फंदी" व्याख्यानमाला असते. अनंत फंदी आडनाव घोलप. हे यजुर्वेदी कोंडय गोत्री ब्राह्मण होते. पूर्वजांचा धंदा गोंधळीपणाचा आणि सराफी याचाही होता. अनंत फंदी यांनी बऱ्याच केल्याने; त्यांचे काही अनुवाद प्रसिद्ध आहेत. त्यानंतर अनंत फंदी यांनी तमाशा केला. त्यांचे तमाशे संघर्षवादी होते, एक मलकफंदी साथी, रतनफंदी, तिसरे राघवफ आणि चवथे हे अनंतफंदी. हे सांगितलेले "चौथे फंदी तमशा खालकरशाहीत गेले. ये कीर्तन करू," अशी आख्यायिकाही रूढ झाली आहे.

अनंतफंदीस फंदी नाव पडण्याचे कारण, पूर्वी संगमनेर येथे "मलकफंदी" म्हणून एक फकीर रहात होता. तो नेहमी लोकांत चमत्कारिक रीतीनें वागत असे म्हणून त्यास फंदी म्हणत. त्या फकिराचा आणि अनंत फंदीचा स्नेह असे. यावरून लोक "फंदी म्हणे" असे चिडवत. "'वेड अनंत फंदीस लागले" "फंदी अनंतकवन सागर" आणि "गातां कोण टिकेना" असा होनाजी बाळानी गौरव केला होता. या कवनसागरातील फारच कवने आज उपलब्ध आहेत. त्यातील पदे, प्रदेश, कटाव, फटके इ. विविध प्रकारची रचना रसाळ व प्रासादिक आहे. "लुंडे हिरसे तद्दू' हा त्यांचा उपदेशपर फटका विशेष लोकप्रिय आहे. त्यांची "श्रीमाधवनिधन ग्रंथ" ही ओवीबद्ध काव्य रचना. या काव्यात सहा अध्याय उपलब्ध आहेत, बाजीरावाची प्रथमची मर्जी होती. 'रावबाजीवर लावणी, नाना नंदीचा पोवाडा आणि फटका हे विशेष नावजले. त्यांना 'फटका' या काव्यप्रकाराचे जनक म्हणतात. फटका बघा-

"हिमायती गरिबुगिरीबाला,

तूं गुरुकावों नको ॥

दोन दिवसांची जाइल सत्ता,

असफल माथां घेउं नको ॥

खूप कर्जबाजारी होउनि,

बोज आपुला दवडुं नको ॥"

शंकराचार्य संध्येतील २४ नावे उघडकीस म्हणून ओळखा, असे म्हटल्यावर फंदीने डफ मारून त्वरित रचना केली अशी आख्यायिका सांगतात. शार्दूलविक्रीडित, शिखरिणी या वृत्तांत त्यांनी रचना केल्या आहेत. अनंत फंदींचा मुलगा सवाई फंदी हे कवी व कीर्तनकार होते. काही रचना अनंत समाजाला बळजबरी पटवून देणे/सांगणे, म्हणजे फटका होय. फटका काव्यप्रकाराचे जनक म्हणजे कवी अनंतफंदी! कवी अनफंदीचे अनेक फटके प्रसिद्ध आहेत. त्यांतील एक उपदेशपर फटका-

"बिकट वाट वहिवाट नसती,

धोपट मार्गा सोडुं नको !!

संविधान रक्षक की आणीबाणीचे जनक काँग्रेसपुढचे ऐतिहासिक सत्य

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

संविधान रक्षक की आणीबाणीचे (आणीबाणीचे जनक)' हा वाद भारतीय राजकारणात काँग्रेस पक्षाच्या भूमिकेभोवती नेहमीच चर्चिला जातो. एका बाजूला भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे आणि संविधान निर्मितीमध्ये मोलाचे योगदान देणारा पक्ष अशी काँग्रेसची प्रतिमा आहे, तर दुसऱ्या बाजूला लोकशाहीचा गळा घोटणारी १९७५ ची आणीबाणी ही देखील काँग्रेसच्याच कार्यकाळात लागू झाली होती.

भारतीय राजकारणात लोकशाही आणि संविधानाचे रक्षण हा अत्यंत वादविवाद आणि चर्चेचा विषय राहिलेला आहे. काँग्रेस पक्षाने विविध आंदोलने आणि मोर्चांद्वारे (जसे की रामलीला मैदानावरील सभा) सत्ताधाऱ्यांवर लोकशाही संस्था कमकुवत केल्या. ज्या संविधान रक्षणाची व लोकशाही वाचविण्याची भाषा आज काँग्रेस करत आहे त्याच काँग्रेसने राज्यघटनेला व लोकशाहीला कलंकित केले हा इतिहास आहे हा इतिहास काँग्रेस विसरली का? संविधान हे राजकीय पक्षांच्या सोयीप्रमाणे वापरण्याचे साधन नसून संपूर्ण राष्ट्राच्या लोकशाही अस्तित्वाचा आधारस्तंभ आहे. सत्तेत असताना संविधानातील तरतुदींचा वापर स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी करायचा आणि विरोधी पक्षात गेल्यानंतर संविधान धोक्यात आल्याचा आक्रोश करायचा, ही राजकीय दुटप्पी भूमिका काँग्रेसची लोकशाहीच्या आरोग्यासाठी योग्य नाही.

इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात लागू करण्यात आलेली २१ महिन्यांची आणीबाणी (१९७५-७७) हा स्वतंत्र भारताच्या लोकशाहीतील सर्वात वादग्रस्त टप्पा मानला जातो. या काळात मूलभूत हक्क स्थगित करण्यात आले, विरोधी नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले आणि माध्यमांवर सेन्सॉरशिप लादण्यात आली. समीक्षक या घटनेला संविधानावरील सर्वात मोठा आघात मानतात.१९७५ मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती, ज्याला भारतीय लोकशाहीच्या इतिहासात एक काळा अध्याय मानले जाते.

२१ महिने (२१ मार्च १९७७ पर्यंत) चाललेल्या या आणीबाणीने देशाची लोकशाही व्यवस्था पूर्णपणे हादरवून सोडली होती.

आणीबाणी लागू करून नागरिकांचे मूलभूत अधिकार निलंबित केले

सरकारविरोधात बोलणे, लिहिणे किंवा शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार जनतेकडून हिरावून घेतला गेला. 'मीसा' सारख्या कडक कायद्यांतर्गत कोणालाही विनावॉरंट अटक करण्याचे अधिकार पोलिसांना मिळाले होते. इंदिरा गांधींनी विरोधी नेत्यांना तुरुंगात डांबले. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई, जॉर्ज फर्नांडिस यांच्यासह हजारो विरोधी नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना रात्रीतून तुरुंगात डांबण्यात आले होते.राजकीय विरोध मोडून काढण्यासाठी सत्तेचा गैरवापर केला गेला.

माध्यमांवर कडक सेन्सॉरशिप लादण्यात आली होती. सरकारला मंजुरी असल्याशिवाय कोणतीही बातमी किंवा लेख छापण्यास बंदी होती. या दडपशाहीचा निषेध म्हणून काही वृत्तपत्रांनी (उदा. 'द इंडियन एक्सप्रेस') आपले संपादकीयचे पान कोरे सोडून सरकारचा निषेध केला होता. इंदिरा गांधी आणि त्यांचे सुपुत्र संजय गांधी यांच्या हाती सर्व सत्ता केंद्रित झाली होती. घटनेत दुरुस्ती करून संसदेचा कार्यकाळ वाढविलाआणि न्यायालयाचे अधिकार मर्यादित करण्यासाठी संविधानात ४२ वी दुरुस्ती करण्यात आली, ज्याला अनेकदा 'मिनी कॉन्स्टिट्यूशन' म्हटले जाते. याशिवाय संजय गांधी यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात आलेली सक्तीची नसबंदी आणि दिल्लीतील झोपडपट्टया हटवण्याची मोहीम (उदा. तुर्कमान गेट दुर्घटना) अत्यंत क्रूर आणि अमानुष ठरली.

काँग्रेसच्या दीर्घकालीन राजवटीत राज्यांमधील विरोधी पक्षांची सरकारे बरखास्त करण्यासाठी कलम ३५६ (राष्ट्रपती राजवट) चा वारंवार वापर करण्यात आल्याचा आरोप केला जातो, ज्यामुळे संघराज्यात्मक रचनेला तडा गेल्याचे म्हटले जाते.१९७० च्या दशकात सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या सेवाज्येष्ठतेचा अधिकार डावलून सरन्यायाधीशांची नियुक्ती करण्याच्या निर्णयावरही लोकशाही मूल्यांचा संकोच केला. १९७७ मध्ये इंदिरा गांधींनी आणीबाणी मागे घेऊन निवडणुका जाहीर केल्या. भारतीय जनतेने या हुकूमशाही प्रवृत्तीला मतपेटीच्या माध्यमातून चोख उत्तर दिले. १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसचा दारूण पराभव झाला आणि इंदिरा गांधी स्वतःची जागाही वाचवू शकल्या नाहीत. देशात पहिल्यांदाच बिगर-काँग्रेस (जनता पक्ष) सरकार स्थापन झाले. १९७७ च्या निवडणुकीत जनतेने काँग्रेसला सत्तेबाहेर केले. त्यानंतर जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले. पुढे १९७८ मध्ये ४४ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीने आणीबाणी लागू करण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचे संरक्षणात्मक बदल केले आणि नागरिकांच्या काही मूलभूत अधिकारांचे संरक्षण अधिक मजबूत केले.भारतीय लोकशाहीमध्ये चुका झाल्या, दडपशाही झाली; परंतु जनतेने मतपेटीतून सत्तेला उत्तर दिले आणि घटनात्मक व्यवस्थेने स्वतःमध्ये सुधारणा करण्याची क्षमता जनता पक्षाने दाखवली.

ज्या काँग्रेसने घटनात्मक मूल्य लोकशाहीची मूल्य पायदळी तुडविली ती काँग्रेस आज मोदी सरकारवर खोटे आरोप करत जनतेत संभ्रम निर्माण करत आहे.

संविधानाची व लोकशाही मूल्यांची पायमल्ली काँग्रेसने केली आज काँग्रेस मोदी सरकारवर घटना बचाव लोकतंत्र बचाओ चा नारा देत वेगवेगळ्या प्रकारचे आंदोलन करत सरकार विरोधात नकारात्मक वातावरण तयार करत आहेत सरकारला अस्थिर करण्याचे काम करत आहे. मोदी सरकारच्या काळात अर्थात एन डी ए च्या काळात ना घटनेची पायमली झाली लोकशाहीची. ना आणीबाणी लावण्यासाठी, विरोधी पक्षांच्या नेत्यांना तुरुंगात डांबण्यात आले.

सरकारने नेहमीच संसदेच्या आणि न्यायालयाच्या चौकटीत राहून निर्णय घेतले आहेत. वारंवार निवडणुका जिंकून जनतेने या सरकारला मोठा कौल दिला आहे, जे लोकशाही जिवंत असल्याचे लक्षण आहे.

मोदी सरकारने विधान दिन साजरा करणे आणि संविधानिक मूल्यांविषयी जनजागृती. संसदेमधील घटनात्मक चर्चा आणि कायदे करण्याची प्रक्रिया. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयांची घटनात्मक भूमिका.

निवडणूक प्रक्रियेच्या माध्यमातून सत्तेची वैधता प्राप्त करणे. थेट लाभ हस्तांतरणामुळे सरकारी योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न. जनधन, आधार आणि डिजिटल व्यवहारांमुळे प्रशासनातील पारदर्शकतेला मिळालेली चालना. महिला, गरीब, वंचित आणि दुर्बल घटकांसाठी राबविण्यात आलेल्या कल्याणकारी योजना लोकशाही पद्धतीने राबविल्या. मोदी सरकारच्या कार्यकाळात संविधानाचा पूर्ण आदर केला गेला आहे. सरकारने वेळोवेळी 'संविधान दिन' साजरा करून आणि संसदेत विशेष चर्चा घडवून आणून संविधानाप्रती आपली कटिबद्धता जाहीर केली आहे. विरोधी नेत्यांवर होणाऱ्या कारवाईबाबत सरकारचा असा युक्तिवाद आहे की, केंद्रीय तपास यंत्रणा या स्वायत्तपणे आणि केवळ भ्रष्टाचार किंवा आर्थिक गैरव्यवहारांच्या प्रकरणांमध्ये कायद्यानुसार कारवाई करत आहेत. यामध्ये कोणताही राजकीय आक्षेप किंवा सूडबुद्धी नाही. कल्याणकारी योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून (आणि शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहचवून लोकशाही तळागाळात मजबूत केली आहे.

संविधान वाचविण्यासाठी आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा लोकशाही अधिकार आहे. मात्र संविधानाच्या नावाने आंदोलन करणाऱ्या राजकीय पक्षांनी स्वतःच्या ऐतिहासिक भूमिकेचेही आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. काँग्रेसने आज संविधान रक्षणाचा नारा देताना आणीबाणीच्या काळातील आपल्या निर्णयांची जबाबदारी स्वीकारली आहे का? तत्कालीन राजकीय चुकांबद्दल नव्या पिढीसमोर प्रामाणिक भूमिका मांडली आहे का? ऐतिहासिक सत्य हेच आहे की, काँग्रेसने भारताला संविधान आणि लोकशाही व्यवस्था देण्यात जेवढे मोठे योगदान दिले, तेवढाच मोठा धक्का १९७५ च्या आणीबाणीमुळे या व्यवस्थेला बसला. त्यामुळे काँग्रेसचा इतिहास हा एकाच वेळी 'संविधानाचा पाया रचणारा' आणि 'तिला तात्पुरते धोक्यात आणणारा' अशा दोन्ही परस्परविरोधी ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार आहे.

- ९५६१५१४३०६

टी-२० तील सलग दुसऱ्या पराभवाने भारताची मालिका सांगता, मालिका ३-२ ने जिंकली

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्धचा पाचवा टी-२० सामना ७ गडी राखून हरला. मात्र, भारतीय संघाने मालिका ३-२ अशी जिंकली. हॅमिल्टन येथे, किवी संघाने १८ षटकांत ३ गडी गमावून १९२ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. टिम सेफर्टने ५० चेंडूंमध्ये ९३ धावा केल्या. ग्लेन फिलिप्सने नाबाद ६५ धावांची खेळी केली. भाराताकडून अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती आणि नितीश रेड्डी यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. तत्पूर्वी शुक्रवारी, नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना, भारतीय संघाने २० षटकांत ८ गडी गमावून १९१ धावा केल्या. ईशान किशनने ३२ चेंडूंमध्ये ६२ धावा केल्या. कर्णधार श्रेयस अय्यरने २३ चेंडूंमध्ये ५० धावांची खेळी केली. न्यूझीलंडच्या ॲडम मिल्नेने ४ बळी घेतले. हॅमिल्टन येथे, ईशान किशन एका वर्षात सर्वाधिक टी२० धावा करणारा भारतीय खेळाडू ठरला. त्याने माजी कर्णधार सूर्यकुमार यादवचा विक्रम मोडला. भारतीय वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक बळी घेण्याचा विश्वविक्रम रचला. तिलक वर्मा नो-बॉलवर झेलबाद झाला.

प्रमुख विक्रम आणि क्षण

ईशानने वावर्षी १२२० टी२० धावा केल्या

ईशान किशनने वावर्षी टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १२२० धावा केल्या आहेत. त्याने सूर्यकुमार यादवचा विक्रम मोडला. सूर्याने २०२२ मध्ये ११६४ धावा केल्या होत्या.

ईशानने १३४५ चेंडूंमध्ये २००० टी२० धावा पूर्ण केल्या

ईशान किशनने ३२ चेंडूंमध्ये ६१ धावा केल्या. तो २,००० टी२० धावा पूर्ण करणारा तिसरा सर्वात वेगवान भारतीय खेळाडू ठरला. हा पराक्रम करण्यासाठी त्याने १३४५ चेंडू घेतले. अभिषेक शर्मा हा १०२४ चेंडूंमध्ये हा पराक्रम करणारा पहिला गोलंदाज आहे.

अर्शदीप सिंग, पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज

अर्शदीप सिंगने टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये पॉवरप्ले दरम्यान ६५ बळी घेतले आहेत. पहिल्या सहा षटकांमध्ये सर्वाधिक बळी घेण्याच्या बाबतीत तो पूर्ण-सदस्य संघांमधील गोलंदाजांमध्ये अव्वल स्थानी पोहोचला आहे.

सॅंटनर, न्यूझीलंडसाठी सर्वाधिक टी२० सामने खेळणारा खेळाडू

मिचेल सॅंटनरने न्यूझीलंडसाठी १४३ टी२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, ज्यामुळे तो या फॉरमॅटमध्ये न्यूझीलंडसाठी सर्वाधिक सामने खेळणारा खेळाडू ठरला आहे. इश सोधी १४२ सामन्यांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे.

फिलिप्स, द्विपक्षीय टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील सर्वाधिक धावा करणारा फलंदाज

ग्लेन फिलिप्सने या पाच सामन्यांच्या मालिकेत ३४१ धावा करून द्विपक्षीय टी२० आंतरराष्ट्रीय मालिकेत सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम केला. त्याने इंग्लंडच्या फिल सॉल्टचा विक्रम मोडला. सॉल्टने २०२३ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेत ३३१ धावा केल्या होत्या.

सामन्यातील काही महत्त्वाचे क्षण...

झेल घेतल्यानंतर फिन एलनचा पाय सीमारेषेला लागला

सहाव्या षटकात ईशान किशन बाद होण्यापासून बचावला. सॅंटनरच्या षटकातील पहिल्याच चेंडूवर ईशानने लॉंग-ऑनच्या दिशेने फटका मारला. सीमारेषेवर झेल घेतल्यानंतर, फिन एलनने चेंडू हवेत उंच उडवला आणि मग झेल घेतला. तथापि, तिसऱ्या पंचांनी रिप्लेमध्ये पाहिले की, जेव्हा एलनचा हात हातात होता, तेव्हा त्याचा उजवा पाय सीमारेषेबाहेर जमिनीवर होता. परिणामी, ईशानला ६ धावा देण्यात आल्या. जेव्हा एलन सीमारेषेबाहेर गेला, तेव्हा चेंडू अजूनही त्याच्या हातात होता.

तिलक वर्माला जीवदान

नॅथन स्मिथच्या १४व्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर तिलक वर्मा झेलबाद झाला. फिन एलनने बॅकवर्ड पॉइंटला उजवीकडे झेप घेऊन एक अप्रतिम झेल घेतला, पण पंचांनी तो नो-बॉल घोषित केला. स्मिथचा पाय क्रीजच्या बाहेर होता. त्यामुळे, तिलकला जीवदान मिळाले आणि पुढच्याच चेंडूवर फ्री हिट मिळाला. नॅथन स्मिथने फ्रंट-फूट नो-बॉल टाकला, ज्यामुळे तिलक बचावला.

अभिषेकने झेप घेऊन अप्रतिम झेल घेत मिचेलला बाद केले

वरुण चक्रवर्तीच्या ९व्या षटकात अभिषेकने एक अप्रतिम झेल घेतला. षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर, डॅरिल मिचेलने स्लॉटमध्ये आलेल्या फुल-लेंथ चेंडूवर मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला. मात्र, चेंडू लॉंग-ऑफच्या दिशेने गेला, जिथे अभिषेक उभा होता. त्याने पुढे झेप घेऊन झेल घेतला. मिचेल १६ चेंडूंमध्ये २९ धावा देऊन बाद झाला.

- ९०९६३७२०८२

शिक्षण म्हणजे केवळ पदवी नव्हे, तर विचारांचे स्वातंत्र्य!

माधुरी धनोकार,
अकोला

आजच्या स्त्रीने स्वतःला विचारावा असा एक महत्त्वाचा प्रश्न. स्त्रीचे खरे स्वातंत्र्य तिच्या हातातील पदवीत नसून तिच्या स्वतंत्र विचारांत, निर्णयक्षमतेत, आत्मसन्मानात आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याच्या धैर्यात आहे. आजची स्त्री शिकली, स्वावलंबी झाली, नोकरी करू लागली, स्वतःच्या पायावर उभी राहिली. तिच्या हातात पदवी आली, आर्थिक स्वातंत्र्य आले, समाजात मान-सन्मानही मिळाला. पण या सगळ्या प्रवासात तिने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे की, मी खरोखर स्वतंत्र झाले आहे का?

मी शिक्षित झाले, पण माझी विचार करण्याची क्षमता स्वतंत्र झाली का? मी पदवी मिळवली, पण अन्यायकारक रूढी-परंपरांना प्रश्न विचारण्याचे धाडस माज्यात निर्माण झाले का? मी सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करते, त्यांच्या कार्याचे गुणगान गाते; पण त्यांच्या विचारांना माज्या दैनंदिन जीवनात स्थान देते का?

हा प्रश्न केवळ एका स्त्रीचा नाही, तर संपूर्ण समाजाच्या मानसिकतेचा आहे.

शिक्षण म्हणजे केवळ अक्षरांची ओळख नव्हे, तर योग्य आणि नव्हता, तर त्यांच्या मनात आत्मविश्वास, स्वाभिमान आणि स्वतंत्र विचारांची ज्योत पेटवण्यासाठी होता. सावित्रीबाईंनी समाजाचा विरोध सहन केला, अपमान पचवला; पण शिक्षणाची वाट सोडली नाही. कारण त्यांना माहीत होते की शिकलेली स्त्री केवळ स्वतःचे जीवन बदलत नाही, तर संपूर्ण पिढीचे भविष्य घडवते.

आज अनेक स्त्रिया उच्चशिक्षित आहेत. त्या मोठ्या पदांवर कार्यरत आहेत, व्यवसाय करीत आहेत, कुटुंबाची जबाबदारी सांभाळत आहेत. मात्र काही ठिकाणी आजही स्त्रीच्या विचारांवर बंधने आहेत. तिने काय घालावे, कुठे जावे, कोणाशी बोलावे, कोणते निर्णय घ्यावेत, यावर दुसऱ्यांचे नियंत्रण असते. घरातील अन्याय सहन करणे म्हणजे संस्कार, स्वतःचे मत न मांडणे म्हणजे समजूतदारपणा आणि परंपरेच्या नावाखाली अन्याय स्वीकारणे म्हणजे संस्कृती, अशी चुकीची समजूत आजही काही ठिकाणी दिसते. परंपरा जपणे चुकीचे नाही; परंतु ज्या परंपरा माणसाच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचवतात, स्त्री-पुरुष समानतेला नाकारतात, त्यांचा विचारपूर्वक पुनर्विचार करणे आवश्यक आहे.

आजच्या स्त्रीने स्वतःला केवळ सुशिक्षित म्हणून मिरवण्यापेक्षा विवेकी, निर्भय आणि आत्मनिर्भर बनवले पाहिजे. स्वतःच्या मुलांना समानतेचे संस्कार दिले पाहिजेत. मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव न करता दोघांनाही समान संधी दिली पाहिजे. दुसऱ्या स्त्रीच्या प्रगतीचा हेवा न करता तिच्या यशात सहभागी झाले पाहिजे. सावित्रीबाईंचे फोटो लावणे, जयंती साजरी करणे, भाषणे देणे यापलीकडे जाऊन त्यांच्या



विचारांचा स्वीकार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. आज गरज आहे ती केवळ शिकलेल्या स्त्रियांची नाही, तर स्वतःच्या विचारांनी जागृत झालेल्या स्त्रियांची! कारण पदवी माणसाला सुशिक्षित बनवते, पण विवेक त्याला प्रगल्भ बनवतो. शिक्षण माणसाला जगण्याची दिशा देते, तर स्वतंत्र विचार त्याला स्वतःची ओळख निर्माण करण्याचे बळ देतात.

चला तर मग, आज प्रत्येक स्त्रीने स्वतःला एक प्रश्न विचारूया...

मी केवळ शिक्षण घेतले आहे, की शिक्षणातून विचार करण्याची ताकदही मिळवली आहे? कारण सावित्रीबाईंच्या विचारांचा वारसा पुढे नेणे म्हणजे त्यांच्या प्रतिमेला वंदन करणे नव्हे, तर त्यांच्या विचारांप्रमाणे जगण्याचे धाडस करणे होय!

- ८४८२९६०११९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

दक्ष खंते आणि जिज्ञासा झाडे 'आयर्नमॅन ७०.३' जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी ठरले पात्र





दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूरच्या क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद कामगिरी करत स्थानिक ट्रायथलॉनपटू दक्ष खंते आणि जिज्ञासा झाडे यांनी प्रतिष्ठेच्या आयर्नमॅन ७०.३ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. ही स्पर्धा २८ आणि २९ ऑगस्ट २०२७ रोजी अमेरिकेतील टेनेसी राज्यातील चॅटनूगा येथे होणार आहे.

१ नोव्हेंबर २०२६ रोजी झालेल्या आयर्नमॅन ७०.३ गोवा स्पर्धेत दोन्ही खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत आपली सहनशक्ती, जिद्द आणि स्पर्धात्मक कौशल्य सिद्ध केले. या कामगिरीच्या जोरावर त्यांनी जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत स्थान मिळवले असून, दोघांनाही पात्रता पदक प्रदान करण्यात आले.

दक्ष खंतेने ५ तास २१ मिनिटे १६ सेकंदांत शर्यत पूर्ण करत उल्लेखनीय यश मिळवले. त्याने पुरुषांच्या १७ ते २४ वयोगटात चौथा क्रमांक, संपूर्ण १३३१ स्पर्धकांमध्ये एकूण १५ वा क्रमांक पटकावत जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध केली आणि पात्रता पदक पटकावले. दक्षची ही तिसरी आयर्नमॅन स्पर्धा होती. यापूर्वी डिसेंबर २०२४ मध्ये त्याने पूर्ण अंतराची आयर्नमॅन स्पर्धा पूर्ण केली होती. त्यात ३.८ किमी पोहणे, १८० किमी सायकलिंग आणि ४२.२ किमी धावणे असे आव्हानात्मक अंतर त्याने १४ तास १४ मिनिटे ४० सेकंदांत पूर्ण केले होते. विशेष म्हणजे, त्याने वयाच्या १८ व्या वाढदिवशी ही पूर्ण अंतराची स्पर्धा पूर्ण करत आपल्या सहनशक्तीच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा गाठला होता.

जिज्ञासा झाडेची पदकविजेती कामगिरी

जिज्ञासा झाडेनेही उत्कृष्ट कामगिरी करत आव्हानात्मक स्पर्धा ७ तास ४७ मिनिटे ५४ सेकंदांत पूर्ण केली. तिने महिलांच्या १८ ते २४ वयोगटात तिसरा क्रमांक तरण एकूण १३३१ स्पर्धकांमध्ये ७१९ वा क्रमांक पटकावत जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्रता गाठली व पात्रता पदक प्राप्त केले.

नागपूर ते जागतिक क्रीडा मंच

आयर्नमॅन ७०.३ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी दोन्ही खेळाडूंनी मिळवलेली पात्रता नागपूरसाठी अभिमानाचा विषय ठरली आहे. या आयर्नमॅन ७०.३ स्पर्धेत १.० किमी पोहणे, ९० किमी सायकलिंग आणि २१.१ किमी धावणे अशा तीन टप्प्यांचा समावेश असतो. दक्ष आणि जिज्ञासा ऑगस्ट २०२७ मध्ये अमेरिकेतील चॅटनूगा येथे होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत नागपूरसह भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी तयारी करणार आहेत.

३७ वर्षांच्या ज्ञानदानातून अनेक पिढ्यांचे आयुष्य उजळविणाऱ्या प्रकाश कापसे सरांचा गौरव

'अविरत प्रकाश' सोहळ्यात मानपत्र, काव्यांजली आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मान



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

तब्बल ३७ वर्षे ज्ञानदानाचे व्रत जपत असंख्य विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार देणारे ज्येष्ठ शिक्षक प्रकाश कापसे सर यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेचा कृतज्ञतापूर्वक गौरव करण्यात आला. 'अविरत प्रकाश' या शीर्षकाखाली आयोजित त्यांच्या सेवानिवृत्ती गौरव सोहळ्यात मित्रपरिवार, सहकारी, विद्यार्थी आणि आप्तस्वकीयांनी त्यांच्या कार्याचे गौरव करीत जुन्या आठवणींना उजाळा दिला. गृहिणी समाज, हनुमान नगर येथे शनिवारी हा सोहळा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यू इंग्लिश हायस्कूल असोसिएशन, नागपूरचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. विलासजी डांगरे होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नागपूर महानगर संघचालक राजेशजी लोया प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. वावेळी नानासाहेब खारपाटे, प्रांजली जोशी, संदीप पंचभाई, वसंत गोमासे, प्रकाश हांडे आणि नंदकिशोर वंजारी यांच्यासह कापसे सरांचे मित्र, सहकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वावेळी मान्यवरांच्या हस्ते कापसे सरांना मानपत्र, काव्यांजली, सन्मानचिन्ह आणि सुटकेस प्रदान करून गौरविण्यात आले. पद्मश्री डॉ. विलासजी डांगरे, राजेशजी लोया आणि नानासाहेब खारपाटे यांनी आपल्या मनोगतातून कापसे सरांच्या अध्यापनातील निष्ठा, विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता आणि सामाजिक बांधिलकीचा गौरव केला. त्यांच्या कार्यातून नव्या पिढीने प्रेरणा घ्यावी, असे आवाहन करत त्यांनी कापसे सरांना निवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात बलदेव आडे, संदीप पंचभाई, पद्माकर चारमोडे, शेखर गजभिये, नंदकिशोर वंजारी आणि कापसे सरांच्या कन्या संस्कृती कापसे यांनी मनोगत व्यक्त केले.

सत्काराला उत्तर देताना प्रकाश कापसे सरांनी आपल्या ३७ वर्षांच्या सेवाकाळातील विविध अनुभव कथन केले. या प्रवासात लाभलेले विद्यार्थी, सहकारी, मित्र आणि आप्तस्वकीय यांच्याविषयी त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. 'माझ्या निवृत्तीचा हा दिवस मी सदैव स्मरणात ठेवीन,' असे भावपूर्ण उद्गार त्यांनी काढले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वसंत गोमासे यांनी केले. रोशन मोहने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर रोशन आगरकर यांनी सूत्रसंचालन केले.

राज्याच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमात नागपूर जिल्ह्याचा समावेश

मुख्यमंत्री फडणवीस यांची संकल्पना, युवकांना कौशल्य प्रशिक्षणासह रोजगाराची संधी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राज्यातील युवकांना उत्तम दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन सातत्याने प्रयत्न करत आहे. मॅजिक बस फाउंडेशनच्या सहयोगाने राज्यातील सात जिल्ह्यांमध्ये यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. नागपूर जिल्ह्याचा या उपक्रमात समावेश करण्यात आल्याने जिल्ह्यातील युवकांना प्रशिक्षणासह रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे. मॅजिक बस इंडिया फाउंडेशनच्या सामाजिक दायित्व निधीअंतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या कौशल्य प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपक्रमात ज्या सात जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे, त्यात नागपूर जिल्ह्यासह वर्धा, अमरावती, अकोला, चंद्रपूर, नाशिक आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा समावेश आहे. या सात जिल्ह्यांमधील २ लाख ५० हजाराहून अधिक वंचित युवकांपर्यंत पुढील पाच वर्षांत पोहोचून त्यांना कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मॅजिक बस इंडिया फाउंडेशनच्या या उपक्रमामध्ये जीवन कौशल्ये, रोजगारक्षमतेचे प्रशिक्षण, उद्योजकता विकास आणि रोजगाराशी जोडणी यांचा एकात्मिक समावेश आहे. महिलांचा श्रमशक्ती सहभाग वाढविणे, स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देणे, ग्रामीण उद्योजकता वाढविणे तसेच पदवीधर युवकांमध्ये रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे या शासनाच्या प्राधान्यक्रमांशी हा उपक्रम सुसंगत असल्याचे या उपक्रमास नागपूर जिल्ह्याशी जोडतांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

श्री गणेश गोशाळेत ५ नोव्हेंबरला गोवत्स बारस पूजन सोहळा

टेकडी गणेश मंदिर व श्री गणेश गोशाळेच्यावतीने आयोजन, भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दीपावली पर्वातील पहिला दिवस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोवत्स बारस अर्थात वसुबारस निमित्त गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी नागपूर जिल्ह्यातील श्री गणेश गोशाळा, मोहगाव झिल्पी येथे गोपूजनाचा धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. श्री गणेश मंदिर टेकडी, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली संचालित श्री गणेश गोशाळेत सकाळी ११ वाजता. हा सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहून गोमातेचे पूजन करण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

भारतीय संस्कृतीत गोमातेला विशेष धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. गोवत्स बारस हा दिवस गायी आणि वासरांच्या पूजनासाठी समर्पित असून, या दिवशी गोमातेची पूजा करून कुटुंबाच्या सुख- समृद्धीसाठी प्रार्थना केली जाते. दिवाळीच्या मंगलमय पर्वाची सुरुवात वसुबारस पासून होत असल्याने या सणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. गोमातेप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, पशुधनाचे महत्त्व जाणून घेणे आणि भारतीय संस्कृतीतील गोसेवेची परंपरा जपणे, हा या सणामागील प्रमुख उद्देश आहे.

गोसेवा आणि गोपूजनाचा धार्मिक सोहळा

श्री गणेश गोशाळा, मोहगाव झिल्पी, ता. हिंगणा, जि. नागपूर येथे आयोजित या कार्यक्रमात गोमातेचे पूजन करण्यात येणार आहे. भक्तिभावाने साजऱ्या होणाऱ्या या सोहळ्याच्या माध्यमातून गोसेवेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. गोमातेचे संरक्षण, संवर्धन आणि संगोपन यांचे महत्त्व अधोरेखित करणारा हा उपक्रम धार्मिक परंपरेसोबतच सामाजिक जाणीव जागृत करण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे.

गोवत्स बारस पूजन सोहळ्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे परिसरातील भाविक, नागरिक आणि गोभक्तांनी या धार्मिक कार्यक्रमाला उपस्थित राहून गोपूजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. दरम्यान, टेकडी गणेश मंदिर, सीताबर्डी, नागपूर येथील 'दि अँड्व्हासरी सोसायटी ऑफ गणेश मंदिर' टेकडीच्या वतीनेही या निमित्ताने विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. सोसायटीच्या आजीव सदस्यांसाठी सकाळी ९ वाजता मंदिरात बस ची सोय करण्यात आल्याची माहिती निमंत्रण पत्रिकेत देण्यात आली आहे.

दीपावलीच्या प्रारंभी गोमातेचे पूजन करून सुख, समृद्धी आणि मंगलमय जीवनासाठी प्रार्थना करण्याची परंपरा जपत यंदाही गोवत्स बारस उत्साहात साजरी करण्याची तयारी करण्यात आली आहे. या सोहळ्याच्या माध्यमातून गोसेवेची भावना अधिक दृढ व्हावी आणि नव्या पिढीपर्यंत भारतीय सण- उत्सवांचे सांस्कृतिक महत्त्व पोहोचावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

गिलबिलीच्या जंगलात कोंबड्यांच्या झुंजीवर जुगार : पोलिसांचा पाठलाग, सहा जण ताब्यात, १.७१ लाखांचा मुद्देमाल जप्त



दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे

कोंबड्यांच्या झुंजीवर पैशांची बाजी लावून सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर बल्लारपूर पोलिसांनी धडक कारवाई केली. तालुक्यातील गिलबिली गावालगतच्या जंगल परिसरात १ नोव्हेंबर रोजी पोलिसांनी छापा टाकला. पोलिसांची चाहूल लागताच जुगार खेळणाऱ्यांनी पळ काढला; मात्र पोलिसांनी पाठलाग करून सहा जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल, दुचाकी, कोंबडे आणि जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ७१ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

बल्लारपूर पोलीस ठाण्याचे पथक ग्रामीण भागात गस्त घालत असताना गिलबिली गावालगतच्या जंगल परिसरात काही जण कोंबड्यांच्या झुंजीवर पैशांची बाजी लावून हार-जीतचा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी घटनास्थळ गाठले. जंगल परिसरात पोहोचताच कोंबड्यांच्या झुंजीवर ५०० रुपयांची बाजी लावल्याचे आवाज पोलिसांना ऐकू आले. त्यानंतर पोलिसांनी अचानक छापा टाकला.

पोलिसांची चाहूल लागताच जुगार खेळणाऱ्यांमध्ये एकच धावपळ उडाली. काही जण हातातील कोंबडे घेऊन जंगलाच्या दिशेने पळू लागले. मात्र, पोलिसांनी तातडीने पाठलाग करून सहा जणांना पकडले. त्यानंतर आरोपींची अंगझडती घेण्यात आली असता त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल आणि जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य आढळून आले.

या कारवाईत नरेश भगतसिंग मडावी (३०), रा. शिवाजी वार्ड, मूल, आनंदराव नामदेव वडस्कर (४६), रा. चनाखा ता राजुरा, संजय बाबाजी फुलझेले (५३, रा. येरगाव ता मुल, सचिन यशवंत जगन्नाथ (३४), रा. चिमडा ता. मुल, कोमल जगन्नाथ निमगडे (३२), रा. पोंभुर्णा आणि गणपत भाऊजी मडावी (६०), रा. येरगाव ता. मूल यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी आरोपींकडून रोख रक्कम, जुगारातून जिंकलेली रक्कम, चार मोबाईल, तीन दुचाकी, चार कोंबडे आणि कोंबड्यांच्या झुंजीसाठी वापरण्यात येणाऱ्या कातीचे दोन नग जप्त केले. असा एकूण १ लाख ७१ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १२ (ब) अन्वये गुन्हा नोंदविण्याची कारवाई करण्यात आली.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, सहायक पोलीस अधीक्षक कुमार सुशांत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बिपिन इंगळे यांचा नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक अनिल राऊत, पोलीस उपनिरीक्षक उमेश जोगदंड, पोहवा सत्यवान कोटनाके, संतोष पंडीत, पुरुषोत्तम चिकाटे, पंकज शिंदे, पोअं शांतकुमार घोसे, फुलचंद लोधी, वैभव गाडगे, गुरु शिंदे, मिलिंद आत्राम, महेश कुकुडकर, सचिन अल्लेवार, शरदचंद्र कारुस यांनी केले.

थोडक्यात

नबीरा महाविद्यालयाच्या एनसीसी विभागातर्फे 'राष्ट्रीय एकता दिवस' सायकल रॅलीचे आयोजन



दै. सिंहवाणी वृत्त, काटोल

भारत सरकारच्या फिट इंडिया मूव्हमेंट अंतर्गत राष्ट्रीय एकता दिवसाचे औचित्य साधून नबीरा महाविद्यालय, काटोल येथील एनसीसी विभागातर्फे 'Sundays on Cycle – National Unity Day' या विशेष सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात महाविद्यालयाचे एनसीसी अधिकारी प्रा. डॉ. अभिजीत देशमुख यांच्या नेतृत्वाखाली एनसीसी कॅडेट्स सहभागी होऊन राष्ट्रीय एकात्मता, शिस्त, संविधानिक मूल्ये, शारीरिक तंदुरुस्ती आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश देण्यात आला. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या विचारांना अभिवादन करणे, युवकांमध्ये संघभावना व शिस्त निर्माण करणे तसेच निरोगी जीवनशैलीसाठी सायकलिंगचे महत्त्व पटवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. सायकल रॅलीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषणमुक्त भारताचाही संदेश देण्यात आला. एनसीसीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी, देशभक्ती आणि राष्ट्रसेवेची भावना रुजविण्याचा सातत्याने प्रयत्न केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेली ही सायकल रॅली युवकांच्या एकजुटीचे आणि राष्ट्रप्रेमाचे प्रतीक ठरणार आहे.

राष्ट्रीय खैरे कुणबी महासंघाची राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

१ नोव्हेंबर रोजी हॉटेल अतिथी इन मानेवाडा रोड नागपूर येथे राष्ट्रीय खैरे कुणबी महासंघाची राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक घेण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष गुणेश्वरराव आरीकर राष्ट्रीय अध्यक्ष राष्ट्रीय खैरे कुणबी महासंघ, उद्घाटक शाहुजी भोयर राष्ट्रीय संघटक, प्रमुख अतिथी श्याम लेडे राष्ट्रीय उपाध्यक्ष, प्रा शेषराव येलेकर राष्ट्रीय कार्याध्यक्ष,बाबाराव भोयर राष्ट्रीय कोषाध्यक्ष, शिवशंकर मुंगाटे राष्ट्रीय सचिव, विनोद चौधरी राष्ट्रीय सल्लागार, यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांचे हस्ते क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जगद्गुरु तुकोबाराय व १९ थोर एकत्र असलेल्या थोर पुरुषांच्या प्रतिमेचे पूजन व मलार्पण करून दिपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्याम लेडे यांनी करून समाजाबद्दल व सद्यच्या घडामोडीबद्दल व राष्ट्रीय खैर कुणबी महासंघाची गरज काय आहेत याची विस्तृत माहिती दिली. गुणेश्वर आरीकर यांनी सुद्धा पूर्वीपासून करीत असलेल्या खैरे कुणबी समाज कार्याबद्दल माहिती दिली. तसेच नविन संघटना निर्माण करण्याचा उद्देश सांगितला व यापुढेही मी सतत समाजकार्य करत राहील असे अभिवचन दिले.

यानंतर ज्यांनी १५ ते २० वर्षापासून समाज कार्य केले अशा खालीलप्रमाणे बंधू भगिनींना शाल श्रीफळ देऊन नथूजी पाल, भैयाजी रडके, नंदा फुकट,अरूणा फाले, सुरेखा रडके, राणी ठाकरे, वैशाली भुजाडे, वर्षा शेंडे, माधुरी आरीकर, उषा देशमुख, कल्पना रडके, याचा सत्कार करण्यात आला.त्यानंतर संघटना विस्ताराकरीता राष्ट्रीय खैरे कुणबी महिला महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष पदी रत्नमालाताई भोयर, राष्ट्रीय खैरे कुणबी युवा महिला महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष पदी प्रणालीताई रोहाड, राष्ट्रीय खैरे कुणबी युवा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष पदी समीर भोयर व सर्व विंगच्या एकूण ५० पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड करून त्यांना सन्मा गुणेश्वरराव आरीकर व इतर मान्यवरांचे हस्ते निवड पत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यानंतर शेषराव येलेकर यांनी नवीन निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना संघटनेचे वाटचाली विषयी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात ७२ समाजबांधवाचा सहभाग होता. आभार प्रदर्शन बाबाराव भोयर यांनी केले.शेवटी राष्ट्रगीत व स्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

'माझा आवाज' वक्तृत्व स्पर्धेत विरखंडीच्या विद्यार्थिनी प्रथम

काव्या ठवकर आणि प्राची नानवटकर यांचे तालुकास्तरावर यश



दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, विरखंडी येथील काव्या ठवकर आणि प्राची नानवटकर या विद्यार्थिनींनी 'माझा आवाज' वक्तृत्व स्पर्धेत तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. दोन्ही विद्यार्थिनींनी प्रभावी सादरीकरणातून वक्तृत्व कौशल्य आणि आत्मविश्वासाचे दर्शन घडविले. त्यांच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

विद्यार्थिनींच्या यशामागे त्यांची मेहनत, जिद्द आणि शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. या यशाबद्दल मुख्याध्यापक आनंद गिरडकर, शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत विरखंडीचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थांनी दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणाऱ्या विरखंडी शाळेच्या या यशाचे परिसरात कौतुक होत आहे.

नलीनी विठ्ठलराव दातीर यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



महाकाली नगर गल्ली नं. २ येथील रहिवासी नलिनी विठ्ठलराव दातीर यांचे आज २ नोव्हेंबर रोजी दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्या ६८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्त परिवार आहे. अंतिम संस्कार मानेवाडा घाटावर करण्यात आले.

थोडक्यात

अतिवृष्टीच्या नुकसानीची भरपाई अद्यापही प्रतीक्षेत!

तीन महिने उलटूनही नागरिकांना मदत नाही, दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई देण्याची जेम्स फ्रान्सिस यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

वाडी परिसरात २८ जुलै २०२६ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे मुख्य नाल्यालगत असलेल्या अनेक नागरिकांच्या घरांमध्ये तसेच दुकानांमध्ये पावसाचे पाणी शिरून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले होते. या घटनेत नागरिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, संबंधित तलाठी हिवरकर यांनी नुकसानग्रस्तांचे पंचनामे करून भरपाईसाठी अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला आहे. मात्र, घटनेला तीन महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही अद्याप नुकसानग्रस्त नागरिकांना आपत्ती व्यवस्थापनांतर्गत नुकसानभरपाईची रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

यासंदर्भात माहितीचा अधिकार कार्यकर्ते जेम्स फ्रान्सिस यांनी सोमवार, २ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांना निवेदन सादर करून नुकसानग्रस्तांना दिवाळीपूर्वी तातडीने भरपाई देण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन पंचनाम्यांच्या आधारे प्रलंबित नुकसानभरपाई त्वरित मंजूर करून ती संबंधित नागरिकांच्या खात्यात जमा करावी, अशी मागणी जेम्स फ्रान्सिस यांनी निवेदनातून केली आहे.

गावाच्या स्वच्छतेसाठी चिमुकल्यांची ग्रामपंचायतीवर धडक!

तिजारे लेआउटमधील झाडे व गवत कापण्याची मागणी; ग्रामविकास अधिकारी सरला चिमोटे यांचे कार्यवाहीचे आश्वासन



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

गावातील समस्या सोडविण्यासाठी राजकीय नेते आणि सामाजिक कार्यकर्ते ग्रामपंचायतीचे दरवाजे ठोठावतात; मात्र अवघ्या ९ ते १० वर्षांच्या चिमुकल्यांनी गावाच्या स्वच्छतेचा प्रश्न थेट ग्रामपंचायतीसमोर मांडत सर्वांचे लक्ष वेधले आहे. दवलामेटी येथील तिजारे लेआउट परिसरात अनावश्यक झाडे व गवत वाढल्याने नागरिकांना ये-जा करताना त्रास सहन करावा लागत आहे. ही समस्या लक्षात घेऊन रिधम बोरकर, सिद्धार्थ नाईक, परी नाईक, पार्थ मसराम आणि डुगु मेश्राम या बालकांनी एकत्र येत ग्रामपंचायतीला लेखी निवेदन दिले. परिसरातील झाडे व गवत कापून स्वच्छता करण्याची मागणी त्यांनी केली.

यावेळी ग्रामविकास अधिकारी सरला चिमोटे यांनी बालकांच्या सामाजिक जाणिवेचे कौतुक करून मागणीवर आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. चिमुकल्यांच्या या सामाजिक पुढाकाराचे ग्रामस्थांकडून कौतुक होत असून, आता ग्रामपंचायत प्रत्यक्ष कार्यवाही कधी करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

रब्बी हंगाम पीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

गहू व हरभरा पिकांसाठी १५ डिसेंबरपर्यंत अर्जाची मुदत

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पीक नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी महाराष्ट्र शासनाने रब्बी हंगाम २०२६-२७ करिता सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली आहे. नागपूर जिल्ह्यात या योजनेची अंमलबजावणी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेडमार्फत करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी विहित मुदतीत विमा हप्ता भरून या योजनेत सहभागी व्हावे. यासाठी नजीकच्या बँक शाखेत किंवा आपले सरकार सेवा केंद्रात संपर्क साधावा. योजनेची अधिक माहिती मिळविण्यासाठी मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी तसेच उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नागपूर यांनी केले आहे.

फटाक्यांमुळे होणाऱ्या वायू व ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारींसाठी २४ तास नियंत्रण कक्ष

नागपूर शहर पोलिसांची यंत्रणा सज्ज, ९८२३३००१०० या क्रमांकावर तक्रार नोंदविण्याचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

फटाके फोडल्यामुळे होणाऱ्या वायू व ध्वनी प्रदूषणाबाबत नागरिकांना तक्रारी नोंदविता याव्यात, यासाठी नागपूर शहर पोलीस आयुक्तालयात तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही व्यवस्था करण्यात आली असून, नागरिकांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत राहणार आहे. मुंबई उच्च न्यायालयात दाखल Suo Motu PIL No. 01/2026 या प्रकरणात १५ ऑक्टोबर २०२६ रोजी पारित झालेल्या आदेशाच्या अनुषंगाने ही कार्यवाही करण्यात आली आहे. फटाक्यांमुळे होणाऱ्या वायू व ध्वनी प्रदूषणासंदर्भात नागरिकांनी ९८२३३००१०० या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधून आपल्या तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन नागपूर शहर पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे. प्राप्त तक्रारींची तात्काळ दखल घेऊन योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल तसेच तक्रारींचे निवारण करण्यासाठी आवश्यक पावले उचलण्यात येतील, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

शारदोत्सवात १ लाख ५० हजार हातांवर खुलले मेहंदीचे रंग!

कांचनताई गडकरींच्या हस्ते मेहंदी रेखाटन, 'जागर शारदेचा, रंग मेहंदीचा' उपक्रमाचा उत्साहात समारोप

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



शारदेच्या भक्तीचा सुगंध, मेहंदीच्या नक्षीचा दरवळ आणि भारतीय संस्कृतीचा रंग... अशा मंगलमय वातावरणात 'जागर शारदेचा, रंग मेहंदीचा' या उपक्रमाचा समारोप उत्साहात झाला. सामाजिक कार्यकर्त्या व संस्कार भारतीच्या अध्यक्षा कांचनताई गडकरी यांनी दिव्यांग महिलेच्या हातावर आकर्षक मेहंदी रेखाटत त्यांच्या आनंदात सहभागी होत उपक्रमाची रंगत वाढवली.

एनआयटी गार्डन, टेलिकॉम नगर येथे झालेल्या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कांचनताई गडकरी होत्या. संयोजिका मनिषा काशीकर यांनी प्रास्ताविक केले. नगरसेविका निधी तेलगोटे, प्रगती पाटील आणि भाजप महिला आघाडीच्या अध्यक्ष दिव्या धुरडे यांची उपस्थिती होती.

कला, साहित्य, संस्कृती आणि भारतीय परंपरांचे जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. यंदा या उपक्रमाचे सहावे वर्ष होते. शारदोत्सवाच्या निमित्ताने महिलांच्या हातांवर मेहंदीच्या नक्षी रेखाटत भारतीय परंपरेचा सुंदर आविष्कार घडविण्यात आला. २४ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान आयोजित या उपक्रमात यंदा महिलांच्या एकूण १ लाख ५० हजार महिलांच्या हातांवर मेहंदीचे रंग खुलले.

या उपक्रमांतर्गत जिल्हा सत्र न्यायालयातील महिलांच्या हातांवर मेहंदी रेखाटण्यात आली. मध्यवर्ती कारागृहातील महिला बंदिवान आणि महिला कर्मचाऱ्यांनाही या उपक्रमाच्या माध्यमातून मेहंदीचा आनंद घेता आला. विविध क्षेत्रांतील महिलांना एकत्र आणत सांस्कृतिक परंपरेशी जोडणारा हा उपक्रम विशेष ठरला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भाजप महिला आघाडीच्या अध्यक्ष दिव्या धुरडे, मनिषा काशीकर, स्वाती आखतकर, शिल्पा पोहोणे, ज्योती देवघरे, प्रीती राजदेरकर, सपना सांगुले, श्रद्धा पाठक, मीता मेंडजोगे, सविता उमाठे, ऋतुजा आमले, कविता इंगळे, मोहिनी रामटेके, सरिता माने, सुषमा चौधरी, निरंजना पाटील, सपना तलरेजा, संगीता गि-हे, अर्चना पाठक, कल्पना पाझारे, विशाखा जोशी, सुजाता खंबाटा, प्रगती पाटील, वंदना शर्मा, सपना रोडी, पल्लवी शामकुळे, वर्षा ठाकरे, मीनाक्षी तेलगोटे, मनीषा अतकरे, निशा भोयर, मधूर भांडारकर, नंदा येवले, मनीषा कोठे, मनीषा धवाडे, श्वेता भोसले, श्रद्धा पाठक, निकिता परावे आणि वैशाली रोहनकर यांचे सहकार्य लाभले.



शहीद फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरुगकर यांच्या कुटुंबीयांना एक कोटींचे अनुदान

वीरपिता आणि वीरमातेला शासकीय निधीतून मदतीचा धनादेश सुपूर्द

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

देशाच्या सुरक्षेसाठी कर्तव्य बजावताना वीरमरण आलेले शहीद फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरुगकर यांच्या कुटुंबीयांना राज्य शासनाच्या वतीने एक कोटी रुपयांचे अनुदान देण्यात आले. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाथरकर यांच्या हस्ते गुरुवार, २९ ऑक्टोबर रोजी शहीद जवानाचे वडील रवींद्र नारायण दुरुगकर (वीरपिता) आणि आई श्रीमती संध्या रवींद्र दुरुगकर (वीरमाता) यांना अनुदानाचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.



फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरुगकर हे नागपूर येथील न्यू सुभेदार लेआउट, हुडकेश्वर रोड परिसरातील रहिवासी होते. देशांतर्गत सुरक्षा मोहिमेच्या अनुषंगाने एसयू-३० एमकेआय विमानाच्या उड्डाणाशी संबंधित युद्धाभ्यासपूर्व प्रशिक्षणाचा सराव सुरू असताना आसाम राज्यातील जोरहाट जिल्ह्यात ५ मार्च २०२६ रोजी झालेल्या विमान अपघातात त्यांना वीरमरण आले.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर केलेल्या व्यवस्थेचे दलित सेनेकडून कौतुक

जिल्हाधिकाऱ्यांना भेटून प्रशासनाचे मानले आभार



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. लाखो अनुयायी दीक्षाभूमीवर दर्शनासाठी आले होते. त्यांच्यासाठी जिल्हा प्रशासनाने राहण्याच्या व्यवस्थेसह विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या. त्यासाठी दलित सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेऊन प्रशासनाचे कौतुक करत आभार मानले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून यावर्षी पहिल्यांदाच अनुयायांसाठी निवास व्यवस्था करण्यात आली होती. दिनांक १९ व २० ऑक्टोबर रोजी देश विदेशातून आलेल्या अनुयायांसाठी अन्य प्रकारच्या विविध सुविधा नियोजनपूर्वक उभारण्यात आल्या होत्या. धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा सोहळा पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यवस्थापन अत्यंत कौतुकास्पद आणि आदर्शवत होते, असे पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या आभार पत्रात नमूद केले आहे.

दरवर्षी प्रमाणे वंदाही दीक्षाभूमीवर जनसागर उसळला होता. इतक्या मोठ्या प्रमाणावर गर्दी असतानाही कुशल नियोजनामुळे कायदा व सुव्यवस्था चोख राहिली, प्रशासनाने पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, निवास व्यवस्था, स्वच्छता आणि वाहतूक नियंत्रण या सर्व आघाड्यांवर चोख कामगिरी बजावली. अत्यंत संवेदनशीलतेने आणि तत्परतेने प्रत्येक समस्येचे जागेवरच निवारण करण्यात आले. लाखो अनुयायांना कोणत्याही प्रकारचा त्रास न होता अत्यंत शिस्तीत आणि शांततेत दर्शन घेता आले. त्याचे संपूर्ण श्रेय सुश्म नियोजन आणि प्रशासकीय यंत्रणेच्या अथक परिश्रमांना जाते. संपूर्ण पोलिस यंत्रणा, महानगरपालिका, आरोग्य विभाग, सर्व शासकीय कर्मचारी व स्वयंसेवकांचे दलित सेनेचे पदाधिकारी सुर्यमणि भिवगडे, भास्कर दरवाडे, प्रमोद सहारे, श्री. राजफुले, बाबू तामगाडगे, प्रशांत लाखे यांनी आभार व्यक्त केले. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त लाखो अनुयायी नागपूरात येतात. त्यांच्यासाठी निवास व अत्यावश्यक सुविधा उभारण्याची मागणी धम्मचक्र प्रवर्तन दिनापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांना भेटून विविध सामाजिक संघटनांनी केली होती. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने सुक्ष्म नियोजन करत या सुविधा उभारणीवर भर दिला होता.

संभाजी ब्रिगेड नागपूर महानगराच्या पुढाकाराने कोजागिरी उत्सव उत्साहात संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

संभाजी ब्रिगेड नागपूर महानगराच्या पुढाकाराने मराठा सेवा संघ व सहयोगी संघटनांच्या संयुक्त सहभागातून शनिवार, दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी मराठा सेवा संघ लॉन, त्रिमूर्ती नगर, नागपूर येथे कोजागिरी उत्सवाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला भगिनी आणि नागरिकांनी आपल्या कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. या कार्यक्रमाला मधुकर मेहकरे, रमेश बोरकुटे, सोमनाथ लाडके, राजीव जगताप, दिलीप खोडके, प्रमोद वैद्य, प्रताप पटले, बालनाथ मानकर,



स्वाती शेंडे, जया देशमुख, सीमा टालाटुले, स्मितल राऊत, मनीषा चौधरी, अनिता ठेंगरे आणि संजीवनी सोमवंती यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच विविध कक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात संगीतसूर्य सांस्कृतिक कक्षाच्या वतीने सुगम संगीताचा सुरेल कार्यक्रम सादर करण्यात आला. आयोजित केलेल्या विविध सांस्कृतिक खेळांमुळे कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले. उपस्थितांनी संगीत, मनोरंजन आणि सामूहिक सहभागाचा मनमुराद आनंद घेतला. या कोजागिरी उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, बंधुभाव, आपुलकी आणि संघटनात्मक एकजूट अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दैनंदिन कामकाजातून वेळ काढून सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कुटुंबीयांना एकत्र येण्याची संधी या कार्यक्रमामुळे उपलब्ध झाली. सामाजिक कार्यासोबतच सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणणे, परस्परांमधील स्नेह वाढविणे आणि संघटनात्मक नातेसंबंध अधिक दृढ करणे, हा या उत्सवामागील प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संभाजी ब्रिगेड नागपूर महानगराच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संगीतसूर्य सांस्कृतिक कक्ष आणि संबंधित सहयोगी घटकांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व उपस्थितांचे आणि सहकार्य करणाऱ्यांचे आयोजकांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

भंडारा येथे दिवाळी फराळ महोत्सव उद्घाटन कार्यक्रम संपन्न

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, भंडारा आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या वतीने फराळ महोत्सवाचे आयोजन, भंडाऱ्यात दिवाळी फराळ व साहित्य महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण महिलांच्या कौशल्याला आणि उद्योजकतेला हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी भंडारा येथे 'दिवाळी फराळ व दिवाळी साहित्य महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, भंडारा आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या वतीने १ ते ५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जिल्हा परिषद परिसरात हा महोत्सव भरविण्यात आला आहे.

दिवाळी म्हटली की घरोघरी फराळाची लगबग, विविध खाद्यपदार्थांची रेलचेल आणि आकर्षक सजावटीच्या साहित्याची खरेदी असे उत्साहाचे वातावरण असते. याच पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील उमेद स्वयं सहायता समूहांच्या महिलांनी तयार केलेला अस्सल घरगुती दिवाळी फराळ, विविध खाद्यपदार्थ तसेच आकर्षक दिवाळी साहित्य नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना एकाच छताखाली दिवाळीच्या खरेदीचा



आनंद घेण्याची संधी मिळत आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध होत असून त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना मिळत आहे.

महिलांच्या हाताला काम, उत्पादनांना बाजारपेठ आणि त्यांच्या कष्टाला योग्य मोबदला मिळवून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

महोत्सवाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून दिवाळीच्या खरेदीसोबतच ग्रामीण महिलांच्या उत्पादनांना प्रोत्साहन देण्याची संधी नागरिकांना मिळत आहे.

नागरिकांनी जिल्हा परिषद परिसरातील या महोत्सवाला भेट देऊन स्थानिक महिला बचत गटांच्या उत्पादनांची खरेदी करावी व त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला हातभार लावावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

या उद्घाटन कार्यक्रमाला जिल्हा परिषद भंडाराच्या अध्यक्ष कवितांताई उईके यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच बांधकाम व शिक्षण समितीचे सभापती नरेशजी ईश्वरकर, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अनिता नलगोपुलवार, समाजकल्याण समितीच्या सभापती शीतल राऊत, जिल्हा परिषद सदस्य यशवंतजी सोनकुसरे, मनीषाताई निम्बार्ते, स्वातीताई वाघाये, दिलीपजी सार्वे आणि प्रतिकजी उईके उपस्थित होते.

दिवाळी फराळ महोत्सव कार्यक्रम व्यवस्थित रित्या पार पाडण्यासाठी गौरव तुरकर , दीपक पाटील व गेडाम सर आणि त्यांची पूर्ण टीमकडून मोलाचे योगदान मिळत आहे.

थोडक्यात

संशोधनाच्या भरारीत उमरेडच्या महाविद्यालयाची चमक!

आविष्कार संशोधन स्पर्धेत श्रेयश्री गजभिये जिल्ह्यात प्रथम, विद्यापीठस्तरीय फेरीसाठी निवड



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे आयोजित 'आविष्कार संशोधन महोत्सव २०२६' अंतर्गत नागपूर जिल्हा ग्रामीण विभागीय फेरीत उमरेड येथील नूतन आदर्श कला, वाणिज्य व श्रीमती म. ह. वेगाड विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. श्रेयश्री गजभिये हिने पदवी गटात प्रथम क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी अंत्योदय इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड रिसर्च सेंटर, देवग्राम नरखेड येथे ही स्पर्धा पार पडली. पदवी गटातील औषधी व औषधनिर्माणशास्त्र विषयाच्या पोस्टर सादरीकरणात श्रेयश्रीने आपले संशोधन प्रभावीपणे मांडत जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळविला. या यशामुळे तिची विद्यापीठस्तरीय फेरीसाठी निवड झाली आहे.

या संशोधन महोत्सवात महाविद्यालयाच्या एकूण पाच विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. वनस्पतीशास्त्र विभागातून कु. धनश्री फडस, कु. सारिका मँदरकर व कु. श्रेयश्री गजभिये, तर रसायनशास्त्र विभागातून कु. माधुरी रावणे आणि श्री. अनिकेत शाहू यांनी संशोधन प्रकल्पांचे पोस्टर सादरीकरण केले. विद्यार्थ्यांचा या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, वनस्पतीशास्त्र व रसायनशास्त्र विभागप्रमुख तसेच सर्व प्राध्यापकांनी अभिनंदन केले.

ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांच्या उपस्थितीत रंगणार 'दीपसंध्या'

शिवाजी महाराज कृती समितीतर्फे ५ नोव्हेंबरला 'कुछ यादें कुछ नगमे'चे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शिवाजी महाराज कृती समितीतर्फे 'दीपसंध्या' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता शिवाजी नगर उद्यान, शिवाजी नगर, नागपूर येथे करण्यात आले आहे. ज्येष्ठ अभिनेत्री, दादासाहेब फाळके पुरस्कार विजेत्या पद्मश्री आशा पारेख यांची प्रमुख उपस्थितीत 'कुछ यादें कुछ नगमे' हा होणार असून यात त्यांच्या चित्रपट कारकिर्दीतील आठवणी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील संगीताचा सुरेल प्रवास उलगडणार आहे. प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर त्यांची मुलाखत घेतील.



कार्यक्रमाची संकल्पना प्रसिद्ध गायक निरंजन बोबडे यांची असून संगीत संयोजन निरंजन बोबडे व महेंद्र ढोले यांचे आहे. धनश्री देशपांडे, मंजिरी वैद्य, गौरी शिदि, मकरंद पाटणकर आणि निरंजन बोबडे हे गायक कलाकार विविध गीते सादर करतील. या विनामूल्य कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून आस्वाद घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाच्या आयोजनात अध्यक्ष अजय संचेती, उपाध्यक्ष संगीत चौहान व विनय अग्रवाल, सचिव श्रीकांत देशपांडे, सहसचिव अश्विन राऊत, कोषाध्यक्ष वंदना कुल्हार तसेच सदस्य कपिल चांडक, डॉ. करण माने, अमित हेडा, धनश्री देशपांडे, मीना सावल, संजीव कालकर, मोहन देशपांडे, डॉ. संगीता कुकडे, संजय पतीवार आणि विनय हरदास यांचा सहभाग आहे. कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक प्लास्टो असून, तनिष्क आणि आर. सदेश ग्रुप हे सहप्रायोजक आहेत. स्प्रिंगडेल स्वीट्स हे कार्यक्रमाचे हॉस्पिटॅलिटी पार्टनर आहेत.

खापरखेडा येथे परमात्मा एक सेवकांची कोजागिरी उत्साहात संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

खापरखेडा येथिल परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळ उगम स्थान संस्थान टिमकी नागपुर अंतर्गत भगवान बाबा हनुमानजीच्या कृपेने आणि महानत्यागी बाबा जुमदेवजीच्या आदेशप्रमाणे शनीवार दि.३१ ऑक्टोबर २०२६ रोजी सेवक रॅजिजी पहाड़े,वार्ड क्रमांक ०३,खापरखेडा यांच्या निवासस्थानी सर्व सेवकांच्या सहकार्याने कोजागिरी कार्यक्रम उत्साहात साजरी करण्यात आली. या कोजागिरी कार्यक्रमाची सुरूवात भगवान बाबा हनुमानजी यांच्या प्रतिमेची आणि बाबा जुमदेवजी यांच्या प्रतिमेचे स्वागत जेष्ठ मार्गदर्शक व कार्यक्रमाचे अध्यक्ष वसंतरावजी उरकुडे (कन्हान),शिवसागर विनकने (कन्हान), राजेन्द्रजी शिवारऊके (तामसवाडी) व जेष्ठ सेवकांच्या हस्ते सायंकाळी ७.००वाजता करण्यात आले व मातोश्री वारणशी आई यांच्या प्रतिमेचे स्वागत प्रमिलाताई पहाड़े,पुजाताई गुरव, अनुसयाबाई नर्खेने, वंदना निकोडे, मायाबाई कावडे या सेविकांनी केले.



त्यानंतर चर्चा बैठकीला सुरुवात झाली. या चर्चा बैठकीमध्ये जेष्ठ मार्गदर्शकानी मार्गदर्शन केले कि जेव्हा बाबा जुमदेवजींनी आपल्या सेवकांना व्यसन मुक्ति,अंधश्रद्धा व अज्ञानाच्या विहिरीतून बाहेर काढले व परमेश्वराच्या अथांग समुद्राशी आपली ओळख करून दिली,तेव्हा आपण या परमेश्वराला आज जाणतो. बाबाच्या सेवकांसोबत घडलेली सत्य घटना ही त्यांनी सांगितले व सेवक,सेविका व बालगोपालांना परमेश्वरांबद्दल मार्गदर्शन केले. याप्रसंगी चर्चा बैठक झाल्यानंतर तामसवाडीतील किष्णा गोंडाने यांचे भजन आयोजित करण्यात आले होते. लगेच सर्व सेवक, सेविका, बालगोपालांसाठी जेवणांची व्यवस्था व सर्वांन दुधाने बनवलेली बांसुदी वाटप करण्यात आली होती.

या कोजागिरी कार्यक्रमाचे संचालन किष्णा लोखंडे यांनी केले तर सेवकांमध्ये रॅजितजी पहाड़े,प्रमोद गुरव,विशाल मुखे, नोमेश निकोडे,ताराचंद ठाकरे,मंगेश गुरव,सुभाष खंडाते, आकाश कावडे,दुलीचंद सोनुंले,विनोद पहाड़े,लक्ष्मण पहाड़े, गणुजी कतोडे यांनी सहकार्य व आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाला शेकडो सेवक,सेविका व बालगोपाल मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकांकिका स्पर्धेत भावनिक आणि सामाजिक विषयांचा वेध 'पाझर'मधून नात्यांतील मायेचा ओलावा तर 'द रोड शो'मधून आधुनिक विसंगतींवर भाष्य

नाट्यतपस्वी राम जाधव स्मृती करंडक खुल्या एकांकिका स्पर्धेचा दुसरा दिवस

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विदर्भ साहित्य संघ, नागपूरच्या वतीने आयोजित नाट्यतपस्वी राम जाधव स्मृती करंडक विदर्भस्तरीय खुल्या एकांकिका स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी 'पाझर' आणि 'द रोड शो' या दोन एकांकिकांमधून कौटुंबिक नात्यांतील भावनिक ओलावा, आधुनिक जीवनातील विसंगती आणि हरवत चाललेल्या मानवी संवेदनांचा वेध घेण्यात आला.



रंगमंडप, बजाजनगर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेच्या निमित्ताने आयोजित रंगचर्चेत मानवी जीवनातील स्थान, तसेच लेखक, कलावंत आणि दिग्दर्शक यांच्या भूमिकांवर विचारमंथन झाले. या चर्चासत्रात डॉ. पराग घोंगे, अनिल इंदाणे, नरेश गडेकर, सुधाकर पाटील, धनंजय मांडवकर आणि निरंजन मार्कंडेयवार यांनी सहभाग नोंदवला. कला माणसाला उत्तम जगण्याची शिकवण देते, तर नाटक अंधारातही खंबीरपणे उभे राहण्याचे बळ देते, असे मत चर्चेत व्यक्त करण्यात आले. कला ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून ती विचारांची समृद्धी आणि जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन देते, असा सूर चर्चेत उमटला.

'पाझर'मधून नात्यांतील मायेचा ओलावा

रोहन पेडणेकर लिखित आणि संकेत महाजन दिग्दर्शित 'पाझर' या एकांकिकेत पालकांचे कष्ट, त्याग आणि मुलांशी असलेल्या भावनिक नात्यांचा वेध घेण्यात आला आहे. आयुष्यातील कठीण प्रसंगी आपली माणसेच खंबीरपणे पाठीशी उभी राहतात. नाती केवळ गरजेपुरती नसून ती आयुष्यभर जपायची असतात, हा भावनिक संदेश या एकांकिकेतून देण्यात आला आहे. या एकांकिकेत संकल्प पायाळ आणि सार्थक पांडे यांच्या भूमिका आहेत. नेपथ्य सागर देशपांडे, संगीत नेहा पायाळ, प्रकाशयोजना उन्मेष देशपांडे, रंगभूषा नेत्रा रेटर आणि वेशभूषा अभिजित कुंभारकर यांनी सांभाळली आहे.

'द रोड शो'मधून आधुनिक जीवनातील विसंगतींवर भाष्य

चंद्ररथ थिएटर्स, नागपूर प्रस्तुत 'द रोड शो - एक फॉल्टी शोकांतिका'या एकांकिकेचे लेखन निरंजन मार्कंडेयवार यांनी केले तर दिग्दर्शन यशवंत चोपडे यांचे होते. या एकांकिकेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात माणसातील संवेदनशीलता कशी हरवत चालली आहे, याचे चित्रण करण्यात आले आहे. वेगवान जीवनशैली, भांडवलशाही आणि पैशांच्या मागे लागलेला माणूस हळूहळू यंत्रवत होत चालला आहे. दुसरीकडे, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यंत्रांमध्ये माणसांपेक्षाही अधिक संवेदनशीलता दिसून येते, हा विरोधाभास एकांकिकेतून मांडण्यात आला. या एकांकिकेत यशवंत चोपडे, डॉ. रसिका गोंधळे-तितरमारे आणि सतीश काळबांडे यांच्या भूमिका होत्या. निर्मिती देवयानी चोपडे यांची, प्रकाशयोजना ऋषभ धापोडकर, संगीत अमित कुबडे, नेपथ्य देवयानी चोपडे आणि धर्मेंद्र चोपडे, वेशभूषा तृप्ती संगीतराव आणि रंगभूषा अदिती येवले यांनी सांभाळले.

आनंदाचा शिधा बंद झाल्याने सर्वसामान्य नागरिक नाराज

मुंबई : दिवाळीचा सण गोड करण्यासाठी शासनाकडून रेशन दुकानांमार्फत दिल्या जाणाऱ्या आनंदाचा शिधाची यंदा प्रतीक्षा करणाऱ्या लाभार्थ्यांच्या पदरी वारंवार निराशा पडली आहे. ही योजना बंद झाल्याने सर्वसामान्य नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. आधीच दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. त्यातच जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती आणि सणासुदीच्या खर्चामुळे गरीब कुटुंबांना दिवाळी साजरी करणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत शासनाच्या आनंदाच्या शिध्यामुळे काहीसा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, दिवाळी अगदी काही दिवसावर येवुन ठेपली असताना रेशन दुकानांत शिधा उपलब्ध नसल्याने गरीब कुटुंबांच्या आनंदावर विरजण पडले आहे. शासनाने दिवाळीचा विचार करून लाभार्थ्यांना तातडीने आनंदाचा शिधा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी गोर गरीब सर्वसामान्य, शेतकरी, नागरीक यांच्याकडून होत आहे.

वंचित बहुजन आघाडी स्थानिक स्वराज्य नियोजनासाठी बैठक संपन्न!

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा : वंचित बहुजन आघाडी नागपूर जिल्ह्यातील कार्यकारणी,महिला आघाडी व युवा आघाडीचे प्रमुख पदाधिकाऱ्यांची आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण बैठक जिल्हाध्यक्ष अजय सहारे यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाध्यक्ष महिला आघाडी महानंदा राऊत,जिल्हाध्यक्ष युवा आघाडी अनिरुद्ध मडके, महासचिव सी.सी. वासे यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुका सावनेर,चेंबरी विश्रामगृह खापरखेडा येथे संपन्न झाली. या बैठकीमध्ये आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने संघटनात्मक तयारी, पक्षविस्तार, नवीन कार्यकर्त्यांची जोडणी, गावपातळीवरील संघटन मजबूत करून "गाव तिथे शाखा" आणि जनसंपर्क अभियान राबविणे यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.



तसेच संघटनेची ताकद वाढविण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखून सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी बैठकीला विजय बागडे,वैभव वेवले,शुभम वाहाणे, धनेश्वर ढोके,राजू बागडे, रोशन सोमकुवर,अँड. संजय गणवीर,छाया सहारे, कविता मेश्राम, बालिता चिमणकर,पूनम बोरकर, शांताराम ढोके,राजहंस मारबते, अरुण गजभिये, भिमराव सोमकुवर, वर्सत मडके,मिलिंद पकाडे,सुषमा निमसरकार,लता म्हैसकर, सरिता दिवे, रेखा बोरकर, मिथुन सहारे,अनिल नांदूरकर,राजेंद्र वासनिक,माधुकर बोरकर उपस्थित होते.

डॉ. सुधीर अग्रवाल लिखित 'ऑपरेशन सिंदूर'चे सोलापूर येथे प्रकाशन संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, सोलापूर

प्रसिद्ध विचारवंत, लेखक आणि शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल लिखित 'ऑपरेशन सिंदूर' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते (दिनांक १/११/२०२६ रोजी) संपन्न झाला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ सुधीर अग्रवाल यांचा सत्कार करण्यात आला. या सन्मान सोहळ्याला साहित्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते.याप्रसंगी मंचावर



डॉ. शिवाजीराव शिदि, कर्मण्यवादी डॉ. लक्ष्मणराव कालें, दत्तात्रय इंगळे आणि श्री. मदन जवळेगेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. ज्ञानदान प्रकाशन संस्था आणि मराठी साहित्य सेवा संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

शिवस्मारक भवन, शिदि चौक, सोलापूर येथे आयोजित या विशेष कार्यक्रमाला साहित्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. पुस्तक प्रकाशनाचा हा सोहळा साहित्यप्रेमींसाठी विशेष आकर्षणाचा विषय ठरला. 'ऑपरेशन सिंदूर' या पुस्तकाचा माध्यमातून डॉ. सुधीर अग्रवाल यांनी समकालीन राष्ट्रीय विषय, देशाची सुरक्षा, राष्ट्रभावना आणि बदलत्या सामाजिक-राजकीय परिस्थितीशी संबंधित विविध पैलूंवर आपले विचार पुस्तकात मांडले. अभ्यासपूर्ण लेखनशैली, समकालीन घटनांचा संदर्भ आणि विषयाकडे पाहण्याचा वैचारिक दृष्टिकोन ही या पुस्तकाची वैशिष्ट्ये आहेत,.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी डॉ. सुधीर अग्रवाल यांच्या साहित्यिक कार्याचं गौरव करत त्यांच्या सातत्यपूर्ण लेखनाची प्रशंसा केली. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि समकालीन विषयांवर त्यांनी आपल्या लेखनातून सातत्याने भाष्य केले असून, त्यांच्या विचारप्रधान लेखनाने वाचकांना चिंतनाची नवी दिशा मिळत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल हे विचारवंत, लेखक आणि शिक्षणतज्ज्ञ म्हणून परिचित आहेत. शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ कार्य करताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच सामाजिक जाणीव आणि वैचारिक प्रबोधनाला विशेष महत्त्व दिले. साहित्य क्षेत्रातही त्यांनी सातत्यपूर्ण आणि उल्लेखनीय योगदान दिले असून, विविध सामाजिक प्रश्नांवर त्यांनी आपल्या लेखणीद्वारे परखडपणे विचार मांडले आहेत.

याप्रसंगी बोलताना डॉ. सुधीर अग्रवाल यांनी पुस्तक लेखनामागील आपली भूमिका स्पष्ट केली. समकालीन घटनांकडे केवळ तात्कालिक दृष्टिकोनातून न पाहता त्यांचा सामाजिक, राष्ट्रीय आणि वैचारिक संदर्भ समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजातील प्रश्नांवर विचारमंथन घडवून आणण्याचे प्रभावी साधन असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात 'ऑपरेशन सिंदूर' या पुस्तकाच्या आशयावरही चर्चा करण्यात आली. उपस्थित साहित्यप्रेमी आणि मान्यवरांनी पुस्तकाच्या प्रकाशनाबद्दल डॉ. अग्रवाल यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या प्रकाशन सोहळ्यामुळे सोलापूरच्या साहित्यिक क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण भर पडल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. कार्यक्रमास साहित्यप्रेमी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.ऑपरेशन सिंदूरच्या प्रकाशनाबद्दल डॉ. सुधीर अग्रवाल यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कुत्रे दुचाकीला आडवे आल्याने युवक जखमी

वाटसरुनी जखमीला तात्काळ मदत, सामाजिक बांधिलकी जपली, संत गुलाबबाबा आश्रम रोडवरील घटना

दै. सिंहवाणी वृत्त, कोंढाळी .

स्थानिक संत गुलाबबाबा आश्रम रोडवर सकाळी दुचाकीने मोहम्मद इजराईल वय ३८ रा. बोरगाव (ढोले) ता कारंजा शनिवरा पेठ कडे जात असतांना समीर ठवळे यांचे ले-आऊट व राऊत यांचे ले-आऊट मधील मार्गावरून सुसाट वेगाने दोन ते तीन कुत्रे मेन रोड टी पॉईंटवर सरळ आल्याने दुचाकी चालकाने ब्रेक मारल्याने गाडी सिमेंट रोड वर पाच ते सहा फूट घासत गेली. चालक मोहंमद यांचे डोक्याला मार लागल्याने रक्त स्त्राव झाल्याने बेशुद्ध पडला. रोडनी जाणारे सुनील चांदपुरे वाटसरू विजय मलवे यांनी आपले वाहन थांबवून जखमीचा रक्त स्त्राव थांबविण्यास पट्टी बांधली. वाटसरू सुधीर बुटे, बालाजी ठवळे, गिरधर परतेती, गौरव धांडे, आदींनी ऑटो चालक रमजान पठाण याला थांबवून प्राथमिक आरोग्य केंद्रात त्वरित उपचारास नेले. त्वरित उपचार केल्याने जखमीला होश आला.जखमीची प्रकृती ठीक आहे.



मानवतेचा परिचय....

संकटकाळी कुणालाही मदत केल्यास हीच खरी सेवा ठरेल. असाच योगायोगाने प्रसंगात सुनील चांदपुरे व इतरांना यांना सेवा करण्याचा आला. कोंढाळी येथे राष्ट्रीय स्वयंम संघ शस्त्र पूजन कार्यक्रम रविवाराला पार पडला. यात वक्ते व मार्गदर्शक यांनी जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा यावर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन झाले होते. यातून प्रेरणा मिळाल्याने सुनील चांदपुरे यांनी सोबत गिरधर परतेतीला घेऊन जखमीला मदत करून उपचाराला सुद्धा तातडीने हॉस्पिटल गाठले.

पूजन व मूर्ती विसर्जन बाजूला करून मदत

विजय मलवे व सुनील चांदपुरे सकाळी बेहरम देव येथे मूर्ती व पूजा साहित्य घेऊन जात असतांना सदर घटना घडली. गाडी त्वरित थांबवून सुनील यांनी जखमीला मदत केली. तर बालाजी ठवळे मलवे यांना बहराम बाबा कडे मूर्ती विसर्जन करिता घेऊन गेले. महत्वाचे म्हणजे संकट काळी मदतीला येणारे सामाजिक बांधिलकी जपतात हे सदर घटनेतून दिसून आले.

उमरेड बाजार समितीत कापूस खरेदीचा शुभारंभ

पहिल्याच दिवशी ४०० हून अधिक शेतकऱ्यांची आवक, प्रतिक्विंटल ९१०० रुपयांपर्यंत भाव

दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

कृषी उत्पन्न बाजार समिती, उमरेड येथे सोमवार, २ नोव्हेंबर रोजी कापूस खरेदीचा शुभारंभ सभापती रुपचंद कडू यांच्या हस्ते करण्यात आला. खरेदीच्या पहिल्याच दिवशी ४०० हून अधिक शेतकऱ्यांनी कापूस विक्रीसाठी बाजार समितीच्या आवारात आणल्याने मोठी गर्दी पाहायला मिळाली. लिलाव प्रक्रियेत कापसाला प्रतिक्विंटल ९१०० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शुभारंभप्रसंगी उपस्थित शेतकऱ्यांचा टोपी व दुपट्टा देऊन सन्मान करण्यात आला. कापसाची आवक मोठ्या प्रमाणात झाल्याने रात्री उशिरापर्यंत वाहनांमधील कापसाचे मोजमाप सुरू होते. यावेळी उपसभापती राजकुमार कोहपरे, संचालक विजय खवास, मनोहर धोपटे, शिवदास कुकडकर, दत्तू फटिंग, नितीन बालपांडे, संदीप हुलके, राहुल नागेकर, महेश मरघडे, भोजराज दांडेडे, ज्ञानेश्वर भोयर, यशोदा अबलर्कर, संगीता ढेंगरे, रंगराव नेवारे, भिका भोयर, छोटू मोटघरे, सुभाष बारापत्रे आदी उपस्थित होते. बाजार समितीचे सचिव प्रकाश महतकर, निरीक्षक अनिल कापसे, व्यापारी कल्पेश काळबांडे, गिरीश बिसानी, अजित चौधरी, किशोर पाटील, हलबा फार्मर प्रोड्यूसर कंपनी, गणेशा व्हाईट गोल्डचे प्रतिनिधी, अडते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शेतकऱ्यांसाठी आकर्षक बक्षिसांची योजना

यंदा बाजार समितीने शेतकऱ्यांसाठी विशेष लकी ड्रॉचे आयोजन केले आहे. यामध्ये प्रथम पारितोषिक म्हणून स्प्लेंडर प्लस मोटारसायकल, द्वितीय एलईडी दूरचित्रवाणी, तृतीय लोखंडी कपाट, चतुर्थ कुलर, पाचवे सौर कुंपण यंत्र २, सहावे पेट्रोल फवारणी पंप २, सातवे टोकन यंत्र ५ आणि आठवे प्लास्टिक टेबल-खुर्ची संच २ अशी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.



कापूस खरेदी सुरू झाल्याने उमरेड व परिसरातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आपला शेतमाल विक्रीसाठी स्थानिक बाजार समितीत आणण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

थोडक्यात

जुनी पेन्शन लागू करण्यासाठी पीएम श्री शाळा सोनपुरीच्या शिक्षकांचा काळ्या फिती लावून निषेध!

एनपीएस विरोधात शिक्षकांचा एल्गार; जुनी पेन्शन योजना लागू करण्याची जोरदार मागणी, शासनाच्या धोरणाविरोधात शिक्षकांनी व्यक्त केली नाराजी



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

महाराष्ट्र शासनाने २००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी लागू केलेल्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली विरोधात राज्यभरातील कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढत आहे. जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करावी, या मागणीसाठी पीएम श्री जिल्हा परिषद केंद्रशाळा सोनपुरी येथील शिक्षकांनी काळ्या फिती लावून शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदविला. शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतरच्या आयुष्याला आर्थिक सुरक्षितता मिळावी, वासाठी जुनी पेन्शन योजना अत्यंत महत्त्वाची असल्याची भावना शिक्षकांनी व्यक्त केली. अनेक वर्षे प्रामाणिकपणे शासकीय सेवा बजावल्यानंतर निवृत्तीच्या काळात सन्मानाने जीवन जगण्यासाठी निश्चित पेन्शन मिळणे हा कर्मचाऱ्यांचा हक्क असल्याचे शिक्षकांनी सांगितले. मात्र, राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीमुळे कर्मचाऱ्यांच्या भविष्यकालीन आर्थिक सुरक्षिततेबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने कर्मचाऱ्यांच्या भावना व मागण्यांचा गांभीर्याने विचार करून जुनी पेन्शन योजना तातडीने लागू करावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी शिक्षकांनी काळ्या फिती लावून एकजूट दाखवित शासनाचे लक्ष वेधले. जुनी पेन्शन योजना लागू होईपर्यंत हा लढा सुरूच ठेवण्याचा निर्धारही शिक्षकांनी व्यक्त केला.

'जुनी पेन्शन हा आमचा हक्क आहे, तो मिळालाच पाहिजे !' असा ठाम संदेश देत पीएम श्री शाळा सोनपुरी येथील शिक्षकांनी आपल्या आंदोलनातून कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागणीला पाठिंबा दर्शविला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक के. झेड.लिल्हारे, जुनी पेन्शन हक्क संघटनेचा जिल्हा सचिव जयेश लिल्हारे, सुरेश चौहान, कु.प्रभा गावंडे, प्रदीप तावाडे, अजय म्हेत्रे, थानसिंह बघेले, शंकरलाल काटेखाये, लिनम मच्छिरके,मनिषा बरैया, सुनीता हुखरे, ओनिशा पाठक, लता मच्छिरके उपस्थित होते.

मनपाच्या स्वच्छतादूत यांच्या कार्याचा गौरव

मान्यवरांच्या हस्ते धरा भूषण पुरस्कार प्रदान



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिका आणि तेजस्विनी महिला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (ता. २) कविवर्य सुरेश भट सभागृह येथे 'धरा भूषण पुरस्कार' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. नागपूर शहर स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या स्वच्छता दूतांच्या योगदानाची दखल घेत त्यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला. मनपाच्या ९ झोन अंतर्गत कार्यरत शंभरहून अधिक कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते नागपूर शहरातील विविध झोनमधील स्वच्छता व्यवस्थेत विशेष योगदान देणारे स्वच्छता निरीक्षक, पर्यवेक्षक आणि कर्मचाऱ्यांना धरा भूषण पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला धरमेठ झोन सभापती धनश्री देशपांडे, नगरसेवक सुनील हिरणवार, जयप्रकाश गुप्ता, मनपा स्वच्छता निरीक्षक दीनदयाळ टेंभेकर, झोनल स्वच्छता अधिकारी लोकेश बासनवार, दिनेश कलोडे, आनंद कोडस्कर, राजेश गायधने, सुरेश खरे, शशिकांत समुद्रे, जयवंत जाधव, स्वच्छ भारत मिशन नागपूरच्या ब्रँड अँबेसिडर व तेजस्विनी महिला मंचच्या प्रमुख किरण मुंदडा तसेच अन्य मान्यवर व स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते.

स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या या उपक्रमातून त्यांच्या योगदानाला सन्मान देण्यासोबतच शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढविण्याचा संदेश देण्यात आला. यावेळी कार्यक्रमासाठी येणाऱ्या सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांचे गुलाब पुष्पांचा वर्षाव करून करण्यात आले. सर्व झोननिहाय स्वच्छता कर्मचाऱ्यांची यादी तयार करून त्यांच्या उपस्थितीची नोंद करण्यात आली. कार्यक्रमाला आलेल्या सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी टग ऑफ्वर, माईंड गेम्स आणि इतर गमतीदार खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

स्वच्छता व सौंदर्यीकरणासाठीचे सेवाभावी कार्य निरंतर सुरू ठेवावे

कार्यक्रमाचे विशेष अतिथी नगरसेवक सुनिल हिरणवार यांनी आपले विचार व्यक्त करतांना तेजस्विनी महिला मंचाच्या माध्यमातून नागरिकत्वाची जबाबदारी सक्षमपणे पार पाडत शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सातत्याने सुरू असलेले कार्य कौतुकास्पद आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत २०२१ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते मंचाला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. शहराच्या स्वच्छता व सौंदर्यीकरणाशी असेच सेवाभावी कार्य निरंतर सुरू ठेवावे, सर्वांनी निरोगी राहावे, स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्याची परंपरा कायम जपावी, असे मत व्यक्त केले. नागपूर शहराच्या हितासाठी आणि विकासासाठी महिला मंचाचे यापुढेही असेच सकारात्मक योगदान मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. स्वच्छ भारत मिशन नागपूरच्या ब्रँड अँबेसिडर व तेजस्विनी महिला मंचाच्या अध्यक्षा श्रीमती किरण मुंधडा यांनी शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या कार्याची अनेकदा योग्य दखल नागरिकांकडून घेतली जात नसल्याचे सांगत त्यांनी आपण जेव्हा स्वच्छ आणि सुंदर रस्त्यांवरून प्रवास करतो, तेव्हा त्यामागे स्वच्छता कर्मचाऱ्यांचे अथक परिश्रम असतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाला आपल्या परिसरातील स्वच्छता कर्मचाऱ्यांची माहिती आणि कार्याची जाणीव असणे आवश्यक आहे. स्वच्छता कर्मचाऱ्यांकडे केवळ कर्मचारी म्हणून न पाहता त्यांना शहराचे स्वच्छता सेनानी म्हणून सन्मान द्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करा!

आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने मंत्रालयातील बैठकीत विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर



राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करण्यासह सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेतील विविध त्रुटी दूर करण्याबाबत शुक्रवार, ३० ऑक्टोबर २०२६ रोजी मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. वित्त विभागाच्या (लेखा व कोषागारे) प्रधान सचिव डॉ. रिचा बागला यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला आमदार सुधाकर अडबाले यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त सर्व NPS/DCPS धारक कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करावी, ही प्रमुख मागणी करण्यात आली. सदर विषय धोरणात्मक असल्याने याबाबतची सकारात्मक भूमिका मंत्री महोदयांकडे मांडण्यात येईल, असे प्रधान सचिव डॉ. रिचा बागला यांनी सांगितले.

केंद्र सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्रातील अनुकंपा नियुक्तीधारक कर्मचाऱ्यांना, ज्यांनी १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्तीसाठी अर्ज केला होता; मात्र, प्रत्यक्ष नियुक्ती त्यानंतर झाली, अशा पात्र कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी करण्यात आली.

तसेच वस्तीशाळा शिक्षकांची सन २००२ पासूनची कंत्राटी सेवा ग्राह्य धरून त्यांना जुनी पेन्शन योजनेचा लाभ देणे, सेवेत असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाला ५० टक्के दराने कुटुंब निवृत्तिवेतन मिळण्यासाठी असलेली किमान सात वर्षांच्या सलग सेवेची अट रद्द करणे, RNPS मधील कर्मचाऱ्यांच्या १० टक्के अनिवार्य अंशदानाच्या जाचक अटींमध्ये सुधारणा करणे, तसेच मूळ नियुक्ती दिनांकापासून अंशदानासाठी सेवा गणना करणे, आदी मागण्या मांडण्यात आल्या. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना ५० टक्के पेन्शनसाठी OPS प्रमाणे अंशदान कपातीचा कालावधी निश्चित करणे, भविष्यातील वेतन आयोगाचे लाभ फरकरमध्ये लागू करणे, डबर प्रमाणे वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनाचा लाभ देणे, स्वेच्छानिवृत्तीबाबत स्पष्ट नियम व मार्गदर्शक सूचना जारी करणे आणि निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली.

याशिवाय DCPS/NPS लागू करण्यात झालेला विलंब किंवा प्रशासकीय दिरंगाईमुळे अंशदान कपात न झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी संरक्षणात्मक तरतूद करणे, किमान ७,५०० रुपये निवृत्तिवेतनाबाबतच्या विसंगती दूर करणे, NPS मधून संचित निधीतील २५ टक्के रक्कम घेतलेल्या कर्मचाऱ्यांना १० टक्के व्याजासह रक्कम जमा करण्याची अट रद्द करणे, सेवेदरम्यान मृत्यू अथवा रुग्णतेमुळे सेवा समाप्त झालेल्या कर्मचाऱ्यांना OPSप्रमाणे संरक्षणात्मक निवृत्तिवेतन लाभ देणे, वयाची ८० वर्षे पूर्ण झाल्यानंतर वाढीव निवृत्तिवेतनाचा लाभ देणे तसेच फरकमध्ये १० वर्षांची किमान सेवा पूर्ण नसलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही पेन्शनचा लाभ देणे, या मागण्यांवरही सविस्तर चर्चा झाली. या सर्व मागण्यांवर प्रधान सचिव डॉ. रिचा बागला यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. संबंधित मागण्यांचा सखोल अभ्यास करून वित्त विभागाकडून योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील कर्मचाऱ्यांनी आयुष्यभर आपले कर्तव्य बजावत असताना त्यांच्या वेतनातून अंशदान जमा केले आहे. मात्र, या योजनेत त्यांना त्यांच्या हक्काचा आणि उचित पेन्शन लाभ मिळत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या हितासाठी शासनाने कोणतीही तडजोड न करता सरसकट जुनी पेन्शन योजनाच लागू करावी, अशी स्पष्ट भूमिका आमदार सुधाकर अडबाले यांनी बैठकीत मांडली. या बैठकीला आमदार रामदास मसराम, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे राज्याध्यक्ष वितेश खांडेकर, राज्य सचिव गोविंद उगले, राज्य कार्याध्यक्ष आशुतोष चौधरी, राज्य कोषाध्यक्ष मिलिंद सोळंके, राजेंद्र ठोकळ, गडचिरोली जिल्हाध्यक्ष गुरुदेव नवघडे, नाना गाढवे, प्रविण झावरे, किरण निंबाळकर, विनायक चौथे, भाऊसाहेब घाडगे, वैशाली गिरी तसेच वित्त विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

महिला बचत गटांच्या उत्पादनांची विक्री आता थेट नागपूरकरांच्या दारी, दिवाळीनिमित्त मनपाचा अभिनव उपक्रम, दहाही झोनमध्ये फिरणार 'विक्री रथ'

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाद्वारे दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत दिवाळी सणानिमित्त महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री करण्यासाठी विशेष 'विक्री रथ' उपक्रम राबविण्यात येत आहे. सोमवार ३ नोव्हेंबर ते ६ नोव्हेंबर दरम्यान महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध वस्तू आता थेट नागपूरकरांच्या दारी उपलब्ध होणार आहेत. उपक्रमाचे उद्घाटन मंगळवार ३ नोव्हेंबर महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते सिव्हिल लाईन्स स्थित मनपा मुख्यालयातील सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. याप्रसंगी यावेळी उप महापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवणी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपिन, अतिरिक्त आयुक्त अंकित, मुरुगनंथम एम., मिलिंद मेश्राम, महिला व बालकल्याण विशेष समिती सभापती सारिका नांदुरकर, उपायुक्त डॉ. रंजना लाडे यांच्या सह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. मनपाच्या सर्व दहाही झोनमध्ये हे विक्री रथ फिरणार असून, सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत नागरिकांना खरेदीची संधी उपलब्ध असणार आहे. महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना देणे आणि स्थानिक उद्योजक महिलांच्या कौशल्याला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या अनुभवाचा लाभ तरुणाईने घ्यावा!

महापौर नीता ठाकरे यांचे प्रतिपादन, मनपात ज्येष्ठ नागरिक दिन साजरा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिका व मनपा ज्येष्ठ नागरिक कक्षातर्फे जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून रविवार १ नोव्हेंबर रोजी मनपाच्या डॉ. पंजाबराव देशमुख स्थायी समिती सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसंतराव पाटील होते. यावेळी महापौर निता ठाकरे यांनी ज्येष्ठ नागरिकांना संबोधित केले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, ज्येष्ठ नागरिकांचे समाजामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्येष्ठ नागरिकांनी नवी पिढी घडविण्यासाठी समोर यावे. आपल्या अनुभवाचा लाभ या पिढीला द्यावा, तरुण पिढी देशाचे भविष्य आहे. ज्येष्ठ नागरिकांमध्ये असलेल्या सज्जन शक्तीचा उपयोग भरकटलेल्या तरुणाईला मुख्य प्रवाहात आणण्याची क्षमता आहे. भारतीय संस्कृतीत ज्येष्ठाना मानाचे स्थान आहे, शासन व मनपा प्रशासन ज्येष्ठ नागरिकांकरीता विविध उपक्रम राबवित असते. मनपा ज्येष्ठ नागरिक समन्वय समिती लवकरच स्थापन करण्याचे त्यांनी जाहीर केले. नागपूर नगरीचा नाव लौकिक वाढेल याकरिता व भावी पिढीला घडविण्याचे काम करणाऱ्या ज्येष्ठांचा सन्मान करण्याची संधी दिल्याने त्यांनी सिनियर सिटीझन कौन्सिल ऑफ नागपूर डिस्ट्रिक्टचे आभार मानले.

सुरवातीला पूज्य साने गुरुजी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. खरा तो एकची धर्म प्रार्थना सादर केली. या प्रसंगी ज्येष्ठ नागरिकांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेतील विजेत्यांना महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. वेशभूषा स्पर्धेचे विजेता प्रथम पुरस्कार सर्जेराव गलपट, द्वितीय पुरस्कार सुरेंद्रकुमार मौर्य, व तृतीय पुरस्कार संजय सातपुते यांना प्राप्त झाला. निबंध स्पर्धेत पहिले पारितोषिक प्रल्हाद दलाल यांनी पटकावले तर द्वितीय पुरस्कार डॉ. साधना तेलरांधे, तृतीय पुरस्कार काशिनाथ धांडे यांना मिळाला. कराओके गीत गायन स्पर्धेत प्रथम पुरस्कार विजय बोरीकर, द्वितीय पुरस्कार मोहन हूड, तृतीय पुरस्कार चंद्रशेखर झाडगावकर, व प्रोत्साहनपर बक्षीस सर्वश्री संजय पूलल स्वार व दिलीप बुरडे यांना जाहीर झाला. द्वितीय व तृतीय रोख पुरस्कार देण्यात आली. वेशभूषा परीक्षण रमेश शोरात, श्रीमती शीला बिडकर व माजी उपायुक्ता पवार यांनी केले. यावेळी ज्येष्ठांनी ७५ वर्ष पूर्ण केली. त्या ७५ ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला. मनपाचा मानाचा दुपट्टा, सन्मानचिन्ह असे या सत्काराचे स्वरूप होते.

सोनपुरी परिसरात धान खरेदी केंद्र सुरू न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली!

शेतात धान कापणीला वेग; मात्र शासकीय खरेदीची प्रतीक्षा! खासगी व्यापाऱ्यांना कमी दरात धान विकण्याची वेळ येण्याची शक्यता, तातडीने खरेदी केंद्र सुरू करण्याची शेतकऱ्यांची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे- सालेकसा

खरीप हंगामातील धान पीक आता पक्व झाले असून सोनपुरीसह सालेकसा तालुक्यातील ग्रामीण भागात शेतकऱ्यांकडून धान कापणी व मळणीच्या कामाला वेग आला आहे. मात्र, अद्याप शासकीय धान खरेदी केंद्र सुरू झाले नसल्याने शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. मोठ्या कष्टाने पिकविलेला धान विकण्यासाठी शेतकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यातच वातावरणातील सततचा बदल आणि अवकाळी पावसाचे सावट यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी अधिकच वाढल्या आहेत.

शासकीय खरेदीला विलंब झाल्यास खासगी व्यापाऱ्यांचे फावणार!

धान उत्पादक जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्ह्यात बहुतांश शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती धान पिकावर अवलंबून असते. शेतीसाठी घेतलेले कर्ज, खते-बियाण्यांची उधारी, शेतीकामासाठी केलेला मजुरीचा खर्च तसेच कौटुंबिक गरजा पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांना पीक हातात येताच पैशांची आवश्यकता असते. अशा परिस्थितीत शासकीय धान खरेदी केंद्र सुरू न झाल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे.

शासकीय हमीभावाने धान खरेदी सुरू होण्यास अधिक विलंब झाल्यास नाइलाजास्तव शेतकऱ्यांना खासगी व्यापाऱ्यांना कमी दरात धान विकावे लागू शकते, अशी भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कष्टाच्या कमाईवर थेट परिणाम होण्याची शक्यता आहे.

अवकाळी पावसाचे सावट; धान सुरक्षित ठेवण्याची समस्या

मागील काही दिवसांपासून वातावरणात सातत्याने बदल होत असून आकाशात ढगांची गर्दी आणि अवकाळी पावसाची शक्यता यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. अनेक अल्पभूधारक व सीमांत शेतकऱ्यांकडे धान सुरक्षित ठेवण्यासाठी पुरेशी गोदामे किंवा पक्क्या साठवणुकीची व्यवस्था नाही. त्यामुळे नाइलाजास्तव शेतकऱ्यांना घराच्या अंगणात, शेतात किंवा ताडपत्रीच्या साहाय्याने धान साठवून ठेवावे लागत आहे. पाऊस झाल्यास धान भिजून त्याच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

तातडीने धान खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी

सोनपुरी परिसरासह सालेकसा तालुक्यातील सर्व निर्धारित शासकीय धान खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्यात यावेत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून शासन व प्रशासनाकडे करण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांची नोंदणी, टोकन वितरण, धान मोजणी व खरेदीची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करावी, जेणेकरून शेतकऱ्यांना आपला शेतमाल विकण्यासाठी भटकंती करावी लागणार नाही.

धान पीक तयार होऊनही वेळेवर शासकीय खरेदी सुरू झाली नाही, तर त्याचा थेट फायदा खासगी व्यापाऱ्यांना होईल आणि आर्थिक नुकसान मात्र शेतकऱ्यांना सहन करावे लागेल, अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

शासन-प्रशासनाच्या निर्णयाकडे शेतकऱ्यांचे लक्ष!

धान उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने धान खरेदी केंद्र सुरू करण्याचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. अन्नदात्यांच्या घामाला योग्य दाम मिळावा आणि त्यांची आर्थिक कोंडी दूर व्हावी, यासाठी शासकीय धान खरेदी प्रक्रिया विनाविलंब सुरू होणे गरजेचे आहे.

अभिमानाने संपन्न झाला सेवापूर्ती सोहळा..!

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



कल्पतरू शिक्षण सामाजिक व सांस्कृतिक संस्था नागपूर द्वारा संचालित देशमुख माध्यमिक विद्यालय हिंगणाच्या मुख्याध्यापिका सौ अपर्णा भिंगारे मॅडम यांचा सेवापूर्ती सोहळा दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी आमदार निवास सभागृह नागपूर या ठिकाणी मोठ्या अभिमानाने संपन्न झाला.

या सेवानिवृत्ती सोहळ्याला अध्यक्षस्थानी उपस्थित होते कल्पतरू शिक्षण सामाजिक व सांस्कृतिक संस्थेचे सचिव रवींद्रजी देशमुख तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे अध्यक्ष धनंजयजी ठाकरे, संस्थेचे उपाध्यक्ष दिलीपजी काळबांडे, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष जयंतजी ठाकरे उपस्थित होते. सेवानिवृत्ती सत्कारमूर्ती अपर्णा भिंगारे, हेमंतजी भिंगारे आणि वृषभ भिंगारे तसेच स्वर्गीय शामरावजी देशमुख स्मृती विद्या मंदिरच्या मुख्याध्यापिका सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून सेवापूर्ती सोहळ्याची रितसर सुरुवात झाली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कारमूर्ती अपर्णा भिंगारे मॅडम यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन अभिमानाने कुटुंबासह सत्कार करण्यात आला. "शाळेचे विद्यार्थी खऱ्या अर्थाने माझे श्वास आहे. त्यांच्या जडणघडणीमध्ये ज्ञानसेवेचा काळ कसा पार झाला कळलेच नाही..!" असे भावोद्गार सत्कारमूर्ती अपर्णा भिंगारे मॅडम यांनी व्यक्त केले.

या सत्कार सोहळ्याप्रसंगी देशमुख माध्यमिक विद्यालय हिंगणा शाळेतील सहाय्यक शिक्षक चितेश नागमोते, सोनाली तोटे, तसेच स्वर्गीय शामरावजी देशमुख स्मृती विद्या मंदिर येथील सहाय्यक शिक्षक विजय सातपुते, अतुल बोबडे सर यांनी मनोगत व्यक्त केले. सोबतच उपस्थित मान्यवरांनी आपले विचार याप्रसंगी अभिमानाने व्यक्त केले. "शिक्षकांनी भिंगारे यांच्या विचारांचा व सद्गुणांचा आदर्श शाळेच्या वाटचालीसाठी आवश्यक घ्यायला पाहिजे.." असे भाव सोहळ्याचे अध्यक्ष रवींद्रजी देशमुख यांनी व्यक्त केले.

सेवानिवृत्ती निमित्ताने या सेवापूर्ती सोहळ्याचे सूत्रसंचालन व आभार देशमुख माध्यमिक विद्यालयाचे सहाय्यक शिक्षक विशाल देवतळे यांनी केले आणि हा अभिमान सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक स्वप्नील ठाकरे, अजय नंदनवार, देवानंद इरपाते, आनंद चंदनखेडे, भरत खोले, चेतन चव्हाण, सचिन घोंगडे, कादर महाजन शिक्षकेतर कर्मचारी चेतन गिरी, बंडू काळबांडे, प्रमोद शंभरकर तसेच स्व. शामरावजी देशमुख स्मृती विद्या मंदिर हिंगणा शाळेतील शिक्षकवृंद नेहा काळबांडे, दुर्गे, महाजन, सुमित भिसेकर, अश्विन शंभरकर आदींनी मोलाचे सहकार्य केले.